University of Mumbai

# संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका

(Peer-Reviewed Research Journal)

वर्ष ०१ ❖ अंक ०२

ऑक्टोबर २०२०

# संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका (Peer-Reviewed Research Journal)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९व्या जयंतीचे (१४ एप्रिल २०२०) औचित्य साधून अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा, मुंबई विद्यापीठ यांच्या कल्पनेतून 'संभाषण' या द्विभाषिक (इंग्रजी आणि मराठी) ऑनलाईन संशोधनपत्रिकेचा जन्म झाला. विभिन्न विद्याशाखांमध्ये समकालीन प्रश्नांबाबतच्या चिकित्सक चर्चेला गतिमान करणे आणि विचारमंथनाद्वारे संवाद प्रस्थापित करणे या भूमिकेचे अधिष्ठान 'संभाषण' संशोधनपत्रिकेच्या मुळाशी कार्यरत असलेले दिसते.

'कोरोना' हा विषय केंद्रस्थानी असलेले 'संभाषण'चे तीन अंक प्रकाशित झाले आहेत. तसेच अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून 'संभाषण'चा ऑगस्ट महिन्याचा अंक 'अण्णा भाऊ साठे विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून या विशेषांकाचे भरभरून स्वागत झाले. तसेच विविध अभ्यासशाखेतील अभ्यासकांनीही सदर विशेषांकाचे संदर्भमूल्य मान्य केले, ही अत्यंत आश्वासक बाब आहे.

'संभाषण'च्या माध्यमातून इंग्रजी आणि मराठी असा द्विभाषिक संशोधनपत्रिकेचा एकत्रित सुरू झालेला प्रवास अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी होता. मात्र काही तांत्रिक कारणांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेतील संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित होणे अपरिहार्य ठरले. तसेच मुंबई विद्यापीठ हे महाराष्ट्रातील सर्वात जुने विद्यापीठ असल्यामुळे राज्यभाषेतून ज्ञानव्यवहार आणि संशोधनव्यवहाराला चालना देण्याचा मुद्दाही अग्रक्रमाने पुढे आला. याला अनुसरूनच मराठी भाषेतील आंतरविद्याशाखीय संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित व्हावी असा प्रस्ताव विद्यापीठाने ठेवला. हा प्रस्ताव अनेक अर्थांनी महत्त्वाचा असल्यामुळे सप्टेंबर २०२०पासून 'संभाषित' या नावाने मराठी संशोधनपत्रिकेची स्वतंत्र वाटचाल सुरू झाली आहे.

# ‘संभाषित’ची रूपरेषा

- सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध स्तरांतील महत्त्वपूर्ण प्रश्न आणि घडामोडींविषयी आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोणातून सिद्ध होणारी मांडणी पुढे येण्यासाठी अभ्यासक/ संशोधकांना खुला मंच उपलब्ध करून देणे ही ‘संभाषित’ची मूलभूत भूमिका आहे.

- संशोधन आणि संशोधनात्मक लेखन हे अंतिमत: समाजासाठीच आहे. त्यामुळे या लेखनाचा एक गृहीत पैलू हा सामाजिकता आहे, या बांधिलकीतून सैद्धांतिक आणि कृतिशील अशा दोन्ही स्तरांवर काम करणाऱ्या अभ्यासक / संशोधकांचे लेखन समाजाच्या विविध स्तरापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच विविध सामाजिक स्तरांमधील वाचकाची अभिरुची आणि वैचारिक जडणघडण सकस होण्यासाठी आवश्यक असणारा अवकाश सिद्ध करण्याची प्रेरणा ‘संभाषित’च्या मुळाशी कृतिशील आहे.

- भारताच्या बरोबरीने भारताबाहेरील मराठी भाषिक अभ्यासक / संशोधकाच्या परिदृष्टीतून जागतिक आणि भारतीय अवकाशातील विविध प्रश्नांविषयीची विश्लेषक मांडणी समाविष्ट करून घेण्यासाठी प्रयत्न करणे, हे ‘संभाषित’चे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

- संशोधनपर, भाष्यपर आणि पुस्तक परीक्षणपर असे तीन विभाग ‘संभाषित’मध्ये अंतर्भूत आहेत. या विभागांत समाविष्ट होणारे लेख सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रांशी संबंधित असल्यामुळे ही संशोधनपत्रिका समाजाच्या विविध स्तरांशी आपला वैचारिक अन्वय जोडेल, असा विश्वास आहे.

- मानव्यविद्याशाखेतील विविध अभ्यासविषयांशी निगडित सैद्धांतिक विवेचन करणाऱ्या लेखांच्या बरोबरीने समाजजीवनातील अनेकस्तरीय संदर्भांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करणाऱ्या लेखांचाही समावेश सदर संशोधनपत्रिकेत केला जाणार आहे. स्वाभाविकच, विविध अभ्यासविषयांशी संबंधित नवनवी सिद्धांतने मराठी भाषेतून पुढे आणणारा हा अतिशय महत्त्वाचा अकादमिक मंच ठरू शकेल.

# शोधनिबंधांसंदर्भातील मार्गदर्शक सूचना

- लेख स्वतंत्र संशोधनावर आधारित असावेत.

- लेखांची शब्दमर्यादा साधारण पुढीलप्रमाणे असेल.
  शोधनिबंध - ३५००-४००० शब्द
  भाष्य - १५००-२००० शब्द
  ग्रंथपरीक्षण - १०००-१२०० शब्द

- शोधनिबंध देवनागरी लिपीमध्ये युनिकोड फॉन्टमध्ये असावेत.
  फॉन्टचा आकार साधारणपणे १२ ते १४ बिंदूमध्ये (point) असावा.

- संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना अंकाच्या शेवटी नोंदविल्या आहेत. लेखात संदर्भ देताना या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

- संशोधनपर लेख विषयतज्ज्ञांच्या सकारात्मक अभिप्रायानंतरच अंकात समाविष्ट केले जातात.

- लेख editorinchief.sambhashit@mu.ac.in व editor.sambhashit@mu.ac.in या दोनही मेलवर पाठवावेत.

# प्रकाशक

***अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय, मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.***

ही संशोधनपत्रिका समाजविज्ञान, मानव्यविद्याशाखा आणि विधी या विद्याशाखांमधील सद्य:कालीन प्रश्नांना आंतरविद्याशाखीय दृष्टिकोणातून भिडणाऱ्या अभिनव आणि टीकात्मक निबंधांचा स्वीकार करते.

"In an ideal society there should be many interests consciously communicated and shared... In other words there must be social endosmosis."

*Dr. B.R. Ambedkar*

# संपादकीय मंडळ

मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांचा 'संभाषित' ई- नियतकालिकाला असलेला आश्वासक पाठिंबा आणि सहकार्य यासाठी आम्ही आदरपूर्वक आभार मानतो.


**मुख्य संपादक** : **डॉ. राजेश खरात**
अधिष्ठाता, मानव्यविद्या शाखा
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**सल्लागार संपादक** : **डॉ. नीतिन आरेकर**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
श्रीमती चांदीबाई हिम्मतलाल मनसुखानी महाविद्यालय,
उल्हासनगर.

**संपादक** : **डॉ. शीतल पावसकर-भोसले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सेवा सदनचे आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर.

**सहसंपादक** : **डॉ. नीतीन रिंढे**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
चेतनाचे श्रीमती कुसुमताई चौधरी कला महाविद्यालय,
वांद्रे (पूर्व), मुंबई.

**डॉ. मंगेश बनसोड**
वरिष्ठ साहाय्यक प्राध्यापक, अकॅडमी ऑफ थिएटर आर्ट्स
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**परीक्षण संपादक** : **डॉ. अश्विनी तोरणे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
डॉ. टी. के. टोपे रात्र महाविद्यालय, परळ, मुंबई.

**साहाय्यक संपादक** : **डॉ. अनंत लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
एस.एम.आर. महाविद्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

**प्रा. आशा हुंबे-पडळकर**
व्याख्याता, मराठी विभाग
भवन्स (कनिष्ठ) महाविद्यालय, अंधेरी, मुंबई.

**डॉ. नारायण गडदे**
साहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. नारायण भोसले**
साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. प्रतिभा टेंबे**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
बदलापूर, जि. ठाणे.

**डॉ. माधुरी पाथरकर**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

**डॉ. लता पांचाळ**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
कल्याण, जि. ठाणे.

**प्रा. संजय इंगोले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
एल.जी.एम. महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी.

**डॉ. सुनील अभिमान अवचार**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. सोनाली वाखरडे**
साहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. विवेक कुडू**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सोनोपंत दांडेकर कला महाविद्यालय, पालघर

रेखाटने : **डॉ. सुनील अभिमान अवचार**

मांडणी व सजावट : **प्रशांत पांचाळ**
ग्राफिक डिजायनर, कल्याण, जि. ठाणे.

तांत्रिक साहाय्य : **डॉ. लता पांचाळ**

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी मुंबई विद्यापीठ, संपादक, संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापराची अपरिहार्यता आणि आधुनिकपूर्व मूल्यसंकेतांचा प्रभाव असलेली समूहमानसिकता यांच्या कोंडीत सापडलेल्या काळाचे आपण साक्षीदार आहोत. मानवी स्पर्श आणि मानवी संपर्काविषयी संशय निर्माण करणाऱ्या अवकाशात गेले काही महिने सगळं जग चाचपडतंय. हे चाचपडणं पृष्ठपातळीवर एका विशिष्ट विषाणूने निर्माण केलेल्या भयप्रद आणि अस्थिर वास्तवाशी नातं सांगणारं असलं, तरी आता ते केवळ तेवढंच उरलंय का, हा गाभ्याचा प्रश्न आहे.

वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवरील भौतिक विकासाच्या आणि समृद्धीच्या मानीव कल्पनांमुळे मानवी गरजा आणि चैन यातील सीमारेषा धूसर झाल्या आहेत. चंगळवादी जीवनशैलीचं जाणता-अजाणता स्वाभाविकीकरण आणि नैसर्गिकीकरण करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. तंत्रस्नेही सामाजिक पर्यावरणाने विविध समाजमाध्यमांतून मुक्त संवादाच्या अगणित, अ-खंड शक्यता खुल्या करण्याची प्रक्रिया गतिमान केली आहे. मात्र जागतिकीकरण, यांत्रिकीकरणातून येणाऱ्या या जीवनशैलीला एका बाजूने पारंपरिक, आधुनिकपूर्व मूल्यचौकटीचे अस्तर चिकटून आहे. तर दुसऱ्या बाजूने तिला नव्याने अस्तित्वात आलेल्या अनेकस्तरीय अधिसत्तेच्या अदृश्य अंकुशाचे अधिष्ठान आहे. विद्यमान काळात अस्तित्वात असणारी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वास्तवातील ही सहजासहजी न सुटणारी गुंतवळ आपल्या अस्तित्वाचा अपरिहार्य हिस्सा झाली आहे. या निबिड भोवतालाचं माणसाला झालेलं आकलन व प्रत्यक्ष वास्तव यातील अंतर आज अधिक उघडंवाघडं होऊन आपल्यासमोर साक्षात झालं आहे. या आकस्मिक समोर येऊन उभ्या ठाकलेल्या अनेकरेषीय वास्तवातून एखादी अस्फुट दिशा शोधण्याचा, सत्याचा (?) काही अंश हाती गवसण्याच्या शक्यतेचा संदर्भबिंदूसुद्धा अनेक अंतर्विरोधांनी भारलेला आहे.

मुळात 'सत्य' या संकल्पनेविषयीच अनेक मूल्यगर्भ प्रश्न उपस्थित करणाऱ्या काळाची संवेदना संपृक्तावस्थेला येऊन पोहोचलीय. आणि या सर्वार्थाने भांबावलेल्या सामाजिक स्थितिगतीत आपलं जगणं आकार घेतंय. आपल्याला जाणवत असलेल्या 'सत्या'वर आपल्या संवेदना, विवेकाचा अधिकार असतो का? की आपल्या संवेदनेचा आणि विवेकाचा आकृतिबंध घडविणाऱ्या अदृश्य यंत्रणेचा हा अधिकार असतो? तसंच या अदृश्य यंत्रणा अनेकस्तरीय सत्तासंबंधांचे राजकीय ताणेबाणे उभे करत असताना, धुरीणत्वाच्या पारंपरिक शस्त्रांवरच समाधान मानतात? की आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून नव्याने सिद्ध झालेल्या आधुनिक

शस्त्रांनाही त्या आपले हस्तक बनवितात? असे कितीतरी प्रश्न यासंदर्भात उपस्थित होऊ शकतात.

वास्तविक पाहता, विषमतापूर्ण चौकटी मोडण्यासाठी प्रयत्नपूर्वक सिद्ध झालेला समताधिष्ठित आधुनिक प्रकल्प आपण सगळ्यांनी समजून घेणं आवश्यक आहे. तसंच दुसऱ्या बाजूला आधुनिकतेच्या बाह्य प्रारूपाखाली दडलेल्या सरंजामी, अस्मितावादी आणि मूलतत्त्ववादी विचारप्रणालीला सतर्कपणे समजून घेणंही तितकंच महत्त्वाचं आहे. खरं तर छुप्या पद्धतीने स्वतःचं अस्तित्व टिकवू पाहणाऱ्या या विषमतामूलक मानसिकतेचा निकराने विरोध करणं गरजेचं आहे आणि या विरोधामागील मूल्यगर्भ अर्थपूर्णता सिद्ध करणं हे आजच्या घडीला आपल्यासमोरील सर्वात मोठं आव्हान आहे. माणसाचा मेंदू, मन आणि वेळ यावर आपली अधिसत्ता गाजवणाऱ्या विविध समाजमाध्यमांच्या विषारी विळख्याने हे आव्हान खरं तर अधिक टोकदार केलंय. माणसाच्या संवेदना आणि विचार गोठवणाऱ्या अत्याधुनिक चक्रव्यूहात आपल्यापैकी अनेकजण आधुनिकपूर्व मानसिकतेसह प्रवेश करते झाले आहेत. हे समाजमाध्यमरूपी चक्रव्यूह माणसाचा अमूल्य काळ कुरतडतंय, मानवी जाणिवा-नेणिवा, दृष्टीबिंदू सगळ्यांवर स्वतःची अधिसत्ता गाजवतंय. अर्थात या अधिसत्तेचा मार्ग 'संमती'च्या (Consent) राजकारणातून जात असल्यामुळे पृष्ठपातळीवर 'भोक्त्या'च्या भूमिकेत दिसणारा समाज त्याच्याही नकळत 'उत्पादनवस्तू' (Product) होऊन उरतोय, ही वस्तुस्थिती आहे.

अत्यानुधिक मार्गांनी पारंपरिक सत्तासंबंधांचं केलं जाणारं दृढीकरण व त्यातून प्रबळ होणारी अनेकमुखी विषमता ही समकालीन वास्तवाची एक बाजू आहे, तर अत्याधुनिक मार्गांनी आधुनिक सत्तासंबंधांची केलेली प्रतिष्ठापना व त्यातून निर्माण होणारी संवेदनाबधिरता ही दुसरी बाजू आहे. काळाने आपल्याला असं दुहेरी खिंडीत गाठलंय. आपल्यासमोर उभं ठाकलेलं हे बहुकेंद्री आव्हान पेलण्याचं बळ मानवी संवादामधून, विवेकी चर्चांमधून, प्रबोधनाच्या कृतिशील उपक्रमांमधून आणि कठोर आत्मपरीक्षणातून मिळू शकेल. अर्थात हे करण्यासाठी आवश्यक असणारा किमान मानवी मूल्यांचा अवकाश जाणीवपूर्वक टिकवून ठेवण्याची पूर्वअट आहेच...

**डॉ. शीतल पावसकर-भोसले**

# शोधनिबंध, भाष्य, आणि पुस्तक परीक्षण

## अनुक्रम...


शोधनिबंध

**गांधीजी आणि सिनेमा** १४
प्रा. अभिजित देशपांडे

**विलास सारंग यांची ‘झुरळं’ : एक वाचन** २१
ज्योती रोटे

भाष्य

**बलात्काराचे मूळ वर्चस्ववादातच** ३१
प्रतिमा जोशी

**ऑनलाईन शिक्षण : सद्य:स्थितीतला एक गोंधळ** ३९
श्रुती पानसे

पुस्तक परीक्षण

**'दीडदमडीना' अर्थात खंडित जगण्याचा कोलाज** ४६
नेहा किशोर सावंत

**कलेपासून कलेकडे : कलाचिंतनाचा प्रवास** ५५
मारुती शेळके

**सीकींग बेगमपुरा: स्वप्नलोकाचे होकायंत्र** ६५
राही श्रुती गणेश

आदरांजली

**भावेबाई** ७४
लीना केदारे

# शोधनिबंध

# गांधीजी आणि सिनेमा

**अभिजित देशपांडे**

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
के. जे. सोमय्या कला व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई
abhimedh@gmail.com

गांधीजींनी सिनेमाकडे जरा सहिष्णूवृत्तीने बघितले असते, तर कदाचित इतिहास काही वेगळाच असता. भारतीय चित्रपटांचाही आणि एकूणच समाजाचाही.

महात्मा गांधी ज्या कालखंडात वावरत होते, त्या कालखंडात भारतातच नाही तर जगभरच अनेक उलथापालथी घडत होत्या. नवनवीन तंत्रज्ञानाचा विकास होत होता. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला होता. मानवी जीवन अधिक जटिल बनत चालले होते. ब्रिटिश, फ्रान्स आदी वसाहतवादी राष्ट्रांनी जगभर आपले हातपाय पसरले होते. पारतंत्र्य व भयग्रस्तता जगभरच दिसत होती. पहिले व दुसरे महायुद्ध याच कालखंडातले. या पार्श्वभूमीवर, गांधीजींची विचारसरणी समजून घ्यायला हवी. गांधी विचारांचे सार थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल : माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याचे व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर आध्यात्मिक उन्नयन करणे, सत्य-अहिंसा-अपरिग्रह-सहकार्य या मार्गांनी सामाजिक उन्नती साधणे. एकूणच तंत्रज्ञान मानवविरोधी आहे, असे त्यांचे ठाम मत होते. गांधीजींनी छापील माध्यमे (वर्तमानपत्रे व पुस्तके) व ध्वनियंत्रणा वगळता, तंत्रज्ञानाला आपल्या व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात फारसा थारा दिला नाही. ते देशभर बहुतांश ठिकाणी फिरले ते सुद्धा पायीच. जिवंत मानवी संवादांवर त्यांचा कायमच भर राहिला. या काळात जन्माला आलेले व बहरलेले चित्रपट माध्यमदेखील त्यांनी या दृष्टीने Sinful Technology मानले. या माध्यमासाठी ना त्यांच्याकडे वेळ होता ना आवड.

१९२७ साली इंडियन सिनेमॅटोग्राफ कमिटीने महात्मा गांधींना त्यांची चित्रपटविषयक मते जाणून घेण्यासाठी एक प्रश्नावली पाठवली होती. कमिटीचे अध्यक्ष टी. रंगचारियार यांना लिहिलेल्या पत्रात गांधीजी म्हणतात, “मी आजवर सिनेमाच पाहिलेला नसल्याने तुमच्या प्रश्नांची उत्तर देण्यासाठी मी योग्य व्यक्ती नाही. पण बाहेरून त्याकडे पाहताना, हे माध्यम अनेक अपप्रवृत्तींना पसरवत असल्याचे जाणवते, आणि हे माध्यम काही चांगल्या गोष्टी करीत असेलच तर तसे अजून सिद्ध व्हायचे बाकी आहे.” (“ Even if I was so minded, I should be unfit to answer your questionnaire, as I have never been to a cinema. But even to an outsider, the evil that it has done and is doing is patent. The good, if it has done any at all, remains to be proved. ” – M K Gandhi, The letter to T Rangachriar dated November 12, 1927). याच ओघात त्यांनी चित्रपटाला Sinful Technology मानले. एक-दोन मुलाखतीत तर

त्यांनी उघडपणेच चित्रपटाची तुलना जुगार, सट्टा, दारू आदी अपप्रवृत्तींशीच केली. यावरून त्यांची चित्रपटविषयक मते किती तीव्र आणि एकांगी होती, हे स्पष्ट होते.

एप्रिल १९३१ च्या फॉक्स फिल्मटोनला दिलेल्या एका मुलाखतीत ते म्हणतात, " मला माहीत आहे की या मुलाखतीने तुमची जाहिरातच अधिक होणार आहे, पण माझ्या या बोलण्यातून मला भारतीय स्वातंत्र्याचा मुद्दाही तुमच्यापर्यंत पोहोचवता येतो आहे. मला प्रचारकीपणाचे महत्त्व मुळीच अमान्य करायचे नाही. किंबहुना जगात मला ग्रेटेस्ट प्रपोगंडिस्ट म्हणून ओळखले जाते, याचीही मला जाणीव आहे. पण माझा प्रपोगंडा सामान्य स्वरूपाचा नाही. मी अकृत्रिम सत्याचा प्रचार करतो आहे." (When interviewed by Fox Filmtone News in April 1931, he prefaced his talk with, " I do not like this kind of thing, but I shall reconcile myself to it, if not more than a few minutes have to be given. Although I know this sort of enterprise will advertise you, which is your primary object, I know also that it will serve to advertise the cause which I represent – India's independence. I do not discount the value of propaganda. I have been described as the greatest propagandist in the world. I may deserve the compliment. But my propaganda is unlike the ordinary. It is that of truth which is self-propagating. Truth abhors artificiality." - News item in The Hindu, May 1, 1931). चित्रपट हे कृत्रिम व अपप्रवृत्तींचा प्रचार करणारे साधन आहे, असेच त्यांचे ठाम मत असावे, असे दिसते.



**गांधीजी आणि चार्ली चॅप्लिन यांची लंडन येथील भेट, १९३१**

संस्कृति

१९३१ मध्ये गांधीजी इंग्लंडमध्ये असताना काही जणांनी पुढाकार घेऊन त्यांची त्यावेळचा सुपरस्टार चार्ली चॅप्लिन याच्याशी भेट घडवून आणली. सुरुवातीला गांधीजींना त्याला भेटण्यात काडीमात्रही रस नव्हता. पण चॅप्लिन सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणारा नायक आहे, चित्रपटातून तो मानवी प्रश्नांचे दर्शन घडवतो, हे सांगितल्यावर गांधीजी त्याला भेटायला तयार झाले. (Collected Works of Mahatma Gandhi, Volume 53: 393).

१९३८ साली भारतीय चित्रपटाचे रजतमहोत्सवी वर्ष साजरे होत असतानादेखील गांधीजींच्या स्वीय सचिवाने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेसाठी गांधीजींच्या वतीने शुभेच्छा संदेश देण्याचे नाकारले. गांधीजी स्वत:च संपादित करीत असलेल्या *हरिजन* या नियतकालिकातील मुलाखतीतही त्यांनी चित्रपट ही मूलत:च वाईट गोष्ट असल्याचे म्हटले आहे. गांधीजींनी आपल्या अवघ्या आयुष्यभरात केवळ एकच चित्रपट पाहिला, आणि तो होता विजय भट्ट यांचा *रामराज्य*. गांधीजींनी पाहिलेला एकमेव चित्रपट म्हणून चित्रपटकर्त्यांनी त्याचा विलक्षण गाजावाजा केला आणि पुढे या चित्रपटाने २५ आठवडे जोरात धंदा केला. महात्मा गांधींनी मात्र एका पत्रात या सिनेमाचा उल्लेख करताना हा निव्वळ 'वेळेचा अपव्यय' असल्याचे म्हटले (Collected Works of Mahatma Gandhi, Vol. 95: 380). रामाविषयी असूनही गांधीजींना हा चित्रपट का आवडला नसेल?

सुप्रसिद्ध चित्रपटकर्मी ख्वाजा अहमद अब्बास यांनी तर गांधीजींना एकदा सविस्तर पत्र लिहून आपल्या चित्रपटविषयक मतांवर पुनर्विचार करा, अशी विनंतीच केली. त्यात ते म्हणतात, "मला माहीत नाही. तुम्ही सिनेमा पाहिला आहे की नाही, तुमची ही चित्रपटविषयक मते इतकी टोकाची कशी काय बनली. तरीही तुम्ही त्याबद्दल जे मत व्यक्त करीत आहात, त्याचा खूप खोलवरचा परिणाम समाजावर होतो. समाज, अवघे जगच तुमच्या मतांना मोलाचे मानते. मला हेही मान्य केलेच पाहिजे की अनेक गल्लाभरू, उथळ मनोरंजनपर चित्रपट सातत्याने बनतात. कदाचित तुमच्या भारतभ्रमणात अशाच चित्रपटांचे पोस्टर्स तुमच्या पाहण्यात आले असतील. म्हणूनही कदाचित तुमची मते अशी झाली असतील. तुम्ही अशा चित्रपटांना मान्यता द्यावी, असे मी कदापिही म्हणणार नाही. मी फक्त एवढेच म्हणतोय की, चित्रपट हे कलामाध्यम, स्व-अभिव्यक्तीचे माध्यम आहे. तेव्हा त्याला सरसकट बाद ठरविणे योग्य नाही. लैंगिकतेचा पुरस्कार करतात म्हणून पुस्तक वा छापील माध्यमाला सरसकटपणे बाद ठरवता येणार नाही, तसेच हेही आहे. तेव्हा

चित्रपटाला वाईट मानणेही चुकीचेच आहे. त्यातून चांगल्या गोष्टीही प्रसृत करता येतात.'' असे म्हणत, अब्बास यांनी सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा काही निवडक भारतीय व पाश्चात्त्य चित्रपटांची यादीच दिली व चांगल्या लोकांनी या माध्यमात रस घ्यायचा असेल, तर तुम्ही चित्रपटाविषयी टोकाची मते टाळावीत, असे आग्रही प्रतिपादन केले. आणि शेवटी ते असेही म्हणाले ''बापू, तुम्ही महात्मा आहात. तुमच्या ठायी अशा क्षुल्लक भेदभावांना थारा असता कामा नये. सिनेमाकडे किंचित दयादृष्टीने बघा आणि आपल्या सहिष्णू वृत्तीने आम्हाला आशीर्वाद द्या.'' पण अर्थातच ख्वाजा अहमद अब्बास यांच्या या पत्राची गांधीजींनी दखल घेतली नाही. गांधीजींची चित्रपटविषयक मते तहहयात तशीच राहिली.

फिल्म इंडियाचे संस्थापक-संपादक बाबूराव पटेल १९४०च्या एका लेखात उद्विग्न होऊन म्हणाले, ''या दरिद्री नारायणाच्या दूताला (गांधीजींना) आमच्यापर्यंत येऊ द्या, एक तर आम्ही त्यांना आमची सिनेमाविषयक मते पटवून देऊ किंवा त्यांनी आम्हाला त्यांची सिनेमाविषयक मते पटवून द्यावीत... अस्पृश्यांसाठी तळमळणाऱ्या या महात्म्यासाठी सिनेमाक्षेत्रातील कलावंत म्हणून आम्हीदेखील तितकेच अस्पृश्य आहोत का...'' पण गांधीजींनी त्याकडेही दुर्लक्ष केले. गांधीजींची ही मते स्वातंत्र्य आंदोलनातल्या कित्येकांनी शिरोधार्य मानली, परिणामी चित्रपट ही काहीतरी वाईट गोष्ट असल्याचाच समज समाजात खोलवर रुजला.


१९३७ साली ए. के. चेट्टीयार यांनी गांधीजींवर एक माहितीपट बनवायला सुरुवात केली. १९४० साली तमिळ भाषेत तो पहिल्यांदा प्रदर्शित झाला. पाठोपाठ त्या माहितीपटाच्या तेलुगू, हिंदी व इंग्रजी आवृत्त्याही निघाल्या. परंतु ब्रिटिश सरकारच्या बंधनांमुळे तो लगोलग मागेही घ्यावा लागला. १९४७ साली मात्र तो पुन:प्रदर्शित झाला. गांधीजींवरचा हा पहिला माहितीपट. त्यापाठोपाठ गांधीजींवर अनेक माहितीपट बनवले गेले. त्यातले कित्येक तर फिल्म्स डिव्हिजननेच बनवले. गांधीजींच्या जीवनचरित्राशी संबंधित कुठल्या ना कुठल्या पैलूवर हे माहितीपट आधारित होते. यांपैकी सर्वांत महत्त्वाचा माहितीपट म्हणजे विठ्ठलभाई जव्हेरी दिग्दर्शित *महात्मा : लाईफ ऑफ गांधी १८६९-१९४८* हा तब्बल सव्वापाच तासांचा माहितीपट आहे. दिनानाथ गोपाळ तेंडुलकर दिग्दर्शित *महात्मा : लाईफ ऑफ मोहनदास करमचंद गांधी* (१९५१) हा गांधीजींवरील दुसरा महत्त्वाचा माहितीपट. तसेच मूळच्या पाकिस्तानच्या असलेल्या पत्रकार मिशाल हुसेन यांनी

बी.बी.सी. साठी चार भागांची लघुमालिका बनवली. यात त्यांनी गांधीजींची भारतातील सुरुवातीची आणि त्यानंतर दक्षिण आफ्रिकेतील वर्षे - याचा धांडोळा घेतला.

१९२१ सालच्या *भक्त विदुर* चित्रपटातील विदुर हे पात्र पोशाख आणि वर्तन यांबाबत गांधीजींशी साधर्म्य सांगणारे असल्याने ब्रिटिशांनी या चित्रपटावर बंदी आणली. १९२२ मध्ये हाच चित्रपट नाव बदलून पुन:प्रदर्शित करण्यात आला. १९५४ साली अमेरिकेतील सी. बी. एस. रेडिओ आणि टेलिव्हिजन कंपनीच्या *यू आर देअर* या मालिकेतील एक भाग द *सॅक्रिफाईस ऑफ महात्मा गांधी* या नावाने गांधीजींच्या आयुष्यावर बेतलेला होता. *नाईन अवर्स टू रामा* या कादंबरीवर आधारित ब्रिटिश चित्रपट १९६३ साली प्रदर्शित झाला. यात नथुराम गोडसेच्या आयुष्यातील गांधीजींची हत्या करण्यापूर्वीचे नऊ तास काल्पनिकरीत्या रंगविण्यात आले होते. भारत सरकारने या चित्रपटावर बंदी घातली आहे.

हंगेरियन चित्रपट दिग्दर्शक गॅब्रियल पास्कल यांनी गांधीजींवर चित्रपट बनविण्यासाठी १९५२ साली पं. जवाहरलाल नेहरू यांची रीतसर परवानगीही घेतली होती. परंतु पास्कल यांच्या आकस्मिक निधनाने ते राहून गेले. द *ब्रिज ऑन द रिव्हर क्वॉय* दिग्दर्शित करणाऱ्या डेव्हिड लीन आणि सॅम स्पिगेल या जोडगोळीनेही गांधीजींवर चित्रपट बनवायचा बेत आखला होता. परंतु *लॉरेन्स ऑफ अरेबिया* करण्याची संधी मिळाल्याने तो मागे पडला तो कायमचाच. गांधीजींवरील सर्वोत्तम चरित्रपट म्हणजे सर रिचर्ड अटेनबरो यांचा १९८२ मधील *गांधी* हा चित्रपट.

यात बेन किंग्जले यांनी विलक्षण अभ्यासाअंती गांधीजींची भूमिका अशी काही वठवली की सुरुवातीला कट्टर गांधीवाद्यांनी त्यांना केलेला विरोध पार मावळला. या चित्रपटाला ५ बाफ्ता आणि ८ ऑस्कर पुरस्कार मिळाले. ही भूमिका मुळात अनुपम खेर किंवा नसीरूद्दीन शाह यांना मिळणार होती, पण मिळाली बेन किंग्जले यांना. आणि किंग्जले यांनी त्या भूमिकेचे अक्षरश: सोने केले.




पुढे अनुपम खेर (नेहरू- *अ ज्वेल ऑफ इंडिया* /१९९०) आणि नसीरूद्दीन शाह (हे *राम* /२०००) यांना अन्य चित्रपटांतून

गांधीजींची भूमिका करण्याची संधी मिळाली, हा भाग निराळा. आजवर, गांधीजींची भूमिका करण्याची संधी मोहन गोखले, सॅम दस्तूर, सुरेंद्र राजन, दिलीप प्रभावळकर, दर्शन जरीवाला, अन्नू कपूर, रजत कपूर आदींना विविध चित्रपटांतून मिळाली आहे. *सरदार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वीर सावरकर, दी लिजंड ऑफ भगतसिंग, सुभाषचंद्र बोस* आदी चित्रपटांत गांधीजींचे पात्र परिघावरचेच राहिले आहे. तसेच चरित्रनायकांचे उदात्तीकरण करताना तर गांधीजींना खलनायकी पद्धतीनेच रंगविण्यात आल्याचे निदर्शनास येते. श्याम बेनेगलांच्या *भारत - एक खोज* या टीव्ही मालिकेत आणि नंतर *मेकिंग ऑफ महात्मा*(१९९६) या चित्रपटात गांधीजी पुनश्च अवतरले. आशुतोष गोवारीकरांचा *स्वदेस* (२००४), जानू बरूआ यांचा *मैने गांधी को नही मारा* (२००५), गिरीश कासारवल्ली यांचा *कुर्मावतार* (२०१२) या चित्रपटांवर गांधीवादाचा गहिरा प्रभाव दिसून येतो. परंतु राजकुमार हिरानींच्या *लगे रहो मुन्नाभाई* (२००६) या चित्रपटाने 'गांधीगिरी' हा शब्द चांगलाच रुजवला. त्यातून देशभर गांधीगिरी स्टाईल काही तात्कालिक आंदोलनेही उभी राहिली. गांधीजींनी सिनेमाला सपशेल नाकारले पण सिनेमाने कधीच गांधीजींना अव्हेरले नाही. ख्वाजा अहमद अब्बास किंवा बाबूराव पटेल यांचे म्हणणे गांभीर्याने घेत गांधीजींनी सिनेमाकडे सहिष्णुवृत्तीने बघितले असते, तर कदाचित इतिहास काही वेगळाच असता. भारतीय चित्रपटांचाही आणि एकूणच समाजाचाही.

# विलास सारंग यांची ‘झुरळं’ : एक वाचन

**ज्योती रोटे**

साहाय्यक प्राध्यापक व प्रमुख
मराठी विभाग
आचार्य मराठे महाविद्यालय, चेंबूर
jyotirote77@gmail.com

## झुरळं

विशेषतः रात्री पाहावीत.
रात्री ती बाहेर येतात खाद्य शोधायला,
निर्धास्तपणे फिरतात घरभर.
कधीकधी मी उशिरा घरी येतो
थकून, खोलीचं दार उघडतो, लाईट लावतो
अन् पाहातो
रात्रीच्या फरशीवर अचानक थबकलेली झुरळं
प्रकाशाने दिङ्मूढ झालेली.

उन्हाळ्यात, उष्म्याने कावलेल्या रात्री
अंधारातून झुरळं उडतात सैरभैर खोलीमध्ये;
चिकचिकल्या, उघड्या अंगाने पांघरुणाविना
झोपेची प्रतिक्षा करताना
ऐकतो मी त्यांचं फडफडणं, पाहतो त्यांच्या
आकृत्या भिरभिरताना भुतासारख्या;
एखादं आपल्या कातडीवर येऊन उतरेल
या भयाने
चिरफाळ्या होत असलेला ताडपत्री पंखा
भिरभिरावतो मी जोराजोराने चोहींकडे
पुराण्या ढालीसारखा.

एकदा माझ्या जुन्या कवितांचे कागद चिवडताना
अकल्पित सापडली मला
झुरळाची दोन अंडी
आणि एकदा जुने कपडे कपाटातून
बाहेर काढले तेव्हा
आढळलं मला एक झुरळ मेलेलं कैक दिवसांपूर्वी
शुष्क झालेलं, पिसासारखं हलकं
तपस्व्याच्या देहाप्रमाणे.
तर एकदा चिक्कार बिअर पिऊन मी लघवीला गेलो

आणि खूप उंचावरून पाहावं तसं
पाहिलं खाली पांढऱ्याफेक फरशीवर पडलेलं
एक झुरळ, बहुधा मेलेलं
अन् भोवती लगबगीने वावरणारा मुंग्यांचा जमाव.
भेलकांडत मी खाली वाकलो पँटीचं बटण लावून
आणि निरखलं झुरळाला :
त्याच्या मिशा हलल्या तिळभर, आयुष्याच्या
दुर्दम्य धुगधुगीसरशी.

वडील वारले अन् त्यांना आंघोळ घातली
तेव्हा त्यांच्या डाव्या कानामधून निघाला
झुरळाचा एक पाय सुकलेला.

काचेच्या टेबल-टॉपवर पाडावं झुरळ उताणं
आणि पाहावं त्याकडे तासन्तास,
पेन्सिलीने त्याला डिवचीत अधूनमधून.

ऐकून आहे की ही फार चिवट जात,
सर्व प्रकाराच्या फवाऱ्यांना पुरून उरणारी;
म्हणे अणुबाँबच्या हलकल्लोळानंतरही तगेल अशी
ही एकच जात :
निर्वाणीच्या किंग साइज हिरोशिमानंतर
राखेच्या ढिगाऱ्यांखालून मिशा झाडीत
बाहेर येतील निर्विकार.

जन्माला यावं तर झुरळाच्या वंशाला.
परंतु ग्रेगोर झाम्झासारखं सर्वांचंच नशीब फळफळत नाही.
चौऱ्याऐंशीव्या योनीमध्ये तरी
जन्मू दे मला झुरळ म्हणून,
एक लठ्ठ झुरळ जपानी बुद्धासारखं.

१

विलास सारंग हे मराठीतले एक महत्त्वाचे प्रयोगशील कवी म्हणून ओळखले जातात. त्यांचे *कविता १९६९-१९८४* व *घडत्या इतिहासाची वाळू* हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कवितेच्या सांकेतिक रूपाला टोकाचा विरोध करीत, नव्या घाटांचा अगदी जाणीवपूर्वक केलेला उपयोग हे सारंगांच्या कवितेचे खास वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कवितेतील अशा प्रयोगांतून प्रामुख्याने वाचकाचे भाषिक भान विस्तारण्याचा व त्याची वाचनपद्धती बदलण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अर्थातच, विलास सारंगांच्या सर्वच कविता अशा भाषिक पातळीवरच्या किंवा रचनाबंधाच्या बाबतीतल्या प्रयोगशीलतेला प्राधान्य देणाऱ्या नाहीत. *कविता १९६९-१९८४* या संग्रहातील दुसरा विभाग किंवा *घडत्या इतिहासाची वाळू* मधील बहुतांश कविता, कवितेचे काहीसे प्रचलित रूप अनुसरताना दिसतात. 'झुरळं' या कवितेचा समावेश अशा तुलनेने आकलनसुलभ वाटणाऱ्या कवितांत होईल. असे असले तरी कवितेत निर्देशिलेले विविध संदर्भ, कवितेचा कथनपरतेकडे झुकलेला घाट, दृश्यात्मकता व चिंतनपरता यांमुळे कवितेला विशेष अर्थपूर्णता प्राप्त झाली आहे. प्रस्तुत टिपणात याच अर्थपूर्णतेचा वेध घेणारे वाचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्या ६०-७०च्या दशकात विलास सारंग लिहिताहेत त्या काळात झुरळ हा कीटक कवितायोग्य विषय म्हणून निषिद्ध मानणारी रोमँटिक कवितापरंपरा बरीच मागे पडली होती. 'तुझ्यासाठी देवा काय म्या झुरावे। झुरळाने कैसे पतंगावे।' असे म्हणणाऱ्या मर्ढेकरी नवकवितेचे युग ओसरून साठोत्तरी बंडखोर कविता जोरकसपणे पुढे येत होती. त्यामुळे केवळ झुरळासारख्या जुगुप्साकारक कीटकाला कवितेच्या केंद्रस्थानी आणून सारंगांना काहीतरी धक्कादायक साधायचे आहे, असे म्हणता येत नाही. मानवी व्यवहाराची क्षुद्रता, निरर्थकता दाखवण्यासाठी किड्यामुंग्यांशी तुलना करण्याची, दृष्टान्त किंवा उपमान म्हणून कीटकसृष्टीचा उपयोग करण्याची दीर्घ परंपरा मध्ययुगीन मराठी साहित्यातही दिसते. गोचिड, मशक, मत्कूण, ढेकूण यांचे संतसाहित्यातील संदर्भ *झुरळं*चे वाचन करताना साहजिकच समोर येतात. विशेषतः 'ढेकणासी बाज गड। उतरचढ केवढी।' या तुकाराम महाराजांच्या अभंगातली दृष्टिकोणसापेक्षता *झुरळं*शी थेटपणे जोडता येते. *दासबोधा*तही माणसांच्या जगाला वेढून राहिलेल्या कीटकसृष्टीचे तपशीलवार वर्णन रामदास करतात. तिथे आलेला झुरळांचा उल्लेखही येथे आठवता येईल.

२

झुरळंचे स्वरूप एखाद्या दृश्यमालिकेसारखे आहे. वरवर ही दृश्ये म्हणजे दैनंदिन जीवनातील साधे घटनाप्रसंग आहेत असे वाटते परंतु प्रत्येक दृश्याला वर्णनात्मकतेच्या पलीकडे घेऊन जाणारा अर्थ वाचकाला जाणवत राहील अशी रचनाही इथे केली आहे. एका अर्थी पहिल्या छेदकापासूनच लौकिक दृश्य व तात्त्विक दर्शन यांना जोडत कविता पुढे सरकताना दिसते. झुरळांचे जग ती रात्री खाद्य शोधायला बाहेर पडतात तेव्हाच आपल्याला दिसू शकते. कधीकधी निवेदक जेव्हा रात्री उशिरा थकून घरी परततो तेव्हा दार उघडून लाईट लावल्यावर त्याला या जगाचे अचानक दर्शन घडते. माणसांचा हस्तक्षेप नसतो तेव्हा ही झुरळे निर्धास्तपणे फिरतात असे तो सांगतो. निवेदकाने अचानक लाईट लावल्याने ही झुरळे थबकतात, प्रकाशामुळे 'दिङ्मूढ' होतात. निर्धास्त फिरणे, दिङ्मूढ होणे या मानवी भावनांचे आरोपण करीत कवी झुरळांच्या जगाला मानवी जगाशी जोडतो आहे. निवेदकाच्या नकळत झुरळांचे हे अधोविश्व प्रकाशात आले आहे. या दृश्यात माणसांच्या हस्तक्षेपाने विचलित झालेली झुरळे आहेत. या दृश्यात झुरळे 'खाली' फरशीवर तर माणूस काहीसा 'वरच्या' पातळीवरून धाड टाकणारा, अचानक प्रकाश टाकणारा आहे. तर दुसऱ्या छेदकात नेमकी त्याउलट स्थिती आहे. उष्म्याने त्रागलेला पांघरुणाविना झोपण्याचा प्रयत्न करणारा निवेदक खाली आहे आणि त्याला भुतांसारखी घाबरवणारी झुरळे वर हवेत उडताहेत. घाबरून पंखा जोराने ढालीसारखा फिरवणारा निवेदक पहिल्या छेदकातल्या झुरळांसारखाच दिङ्मूढ झालेला आहे. या दोन्ही छेदकांतले झुरळ व माणूस यांच्यातले संबंध काहीसे संघर्षाचे आहेत. एकीकडे झुरळे माणसांच्या दहशतीत जगताहेत तर दुसरीकडे माणसांनाही त्यांची दहशत वाटते आहे.

तिसऱ्या छेदकात हे चित्र एकदम बदलते. एकमेकांवर कुरघोडी करणाऱ्या या दोन जगांनी परस्परांचे साहचर्य व सहजीवन आता जणू स्वीकारले आहे. निवेदकाच्या कवितांच्या कागदात झुरळांची अंडी अकल्पितपणे सापडतात तर त्याच्या कपाटात मेलेल्या झुरळाचा शुष्क, पिसासारखा हलका झालेला मृतदेह आढळल्याचे वर्णन निवेदक करतो. इथे त्या शुष्क झुरळाची तुलना निवेदक तपस्व्याच्या देहाशी करतो आहे. आधीच्या परस्पर-दहशतीची जागा आता आदराने घेतली आहे. दृश्यात्मकतेच्या पातळीवरही माणूस व झुरळ आता एका समांतर स्थानावर आले आहेत. कवितांचे कागद, कपड्यांचे कपाट या माणसाच्या अत्यंत खाजगी अवकाशात झुरळांचे जीवनचक्र मिसळून गेले

आहे. पुढच्या छेदकात हा अवकाशाच्या पातळीवरील स्थानभेद अधिक प्रकट व गतिशील झाला आहे. आधी 'खूप उंचावरून पाहावं तसं' मरू घातलेलं झुरळ पाहणारा निवेदक झुरळाच्या अवस्थेचे निरीक्षण करण्यासाठी जाणीवपूर्वक खाली वाकतो आहे. झुरळाला मुंग्यांच्या जमावाने वेढले आहे. त्या जमावाचे लवकरच ते भक्ष्य होणार आहे. या प्रसंगातही त्या झुरळाच्या हलणाऱ्या मिशा म्हणजे जणू जगण्याची दुर्दम्य धुगधुगी आहे असे निवेदक सांगतो. या दोन्ही छेदकात मृत्यू आणि जीवन यांच्या सीमारेषेवरील 'हलका झालेला तपस्व्याचा देह', 'मरणासन्न अवस्थेत पोहोचलेले झुरळ' या प्रतिमांचा नेमका उपयोग केला गेला आहे. यांतून कवितेचा सूर अधिक गडद होण्यास मदत झाली आहे. पुढे माणूस व झुरळाच्या साहचर्याला मृत्यूचा, वडिलांच्या मृतदेहाचा संदर्भ जोडून हा गडदपणा अधिक तीव्र केला आहे. मृतदेहाच्या कानातून झुरळाचा सुकलेला पाय निघणे हे दृश्य मानवी जगण्यातली शोकात्म निरर्थकता अधोरेखित करते असे म्हणता येईल.

यापुढच्या तीन ओळींच्या छेदकात पुन्हा एकदा झुरळ आणि माणूस यांच्यातल्याच नव्हे तर माणसामाणसांतल्या सत्तासंबंधांचे संसूचन करणारे दृश्य समोर येते. टेबलटॉपवर झुरळाला उताणे पाडून त्याच्या असहाय अवस्थेचा खेळ तासन् तास पाहणारा, त्याला अधूनमधून पेन्सिलने डिवचून हिंसक, आसुरी आनंद मिळवणारा निवेदक मानवी मनातल्या खोलवरच्या क्रौर्याचे दर्शन घडवतो.

इथपर्यंत कवितेतला निवेदक झुरळांविषयीच्या त्याच्या कथनाला स्वतःच्या व्यक्तिगत आयुष्यातील घटनाप्रसंगातून वैधता बहाल करण्याचा प्रयत्न करतो आहे. पुढच्या छेदकात हे विवेचन अधिक सर्वसामान्य पातळीवर तो नेतो. 'ऐकून आहे की' असा मोघमपणाचा पवित्रा घेत झुरळांविषयीच्या काही प्रचलित समजुती व तथ्ये पुढे आणली जातात. झुरळांची जात अत्यंत चिवट आहे, टोकाच्या प्रतिकूल परिस्थितीवर ती मात करू शकते, कीटकनाशकांच्या सर्व प्रकारच्या फवाऱ्यांना झुरळे पुरून उरली आहेत, मानवी जगातल्या प्रलयंकारी घटनांचाही झुरळांवर कोणताही परिणाम झालेला नाही. एका अर्थी, मानवी इतिहासाहून अधिक उन्नत व शाश्वत अशा कालप्रवाहात ती वावरताहेत. भविष्यात संपूर्ण मानवी संस्कृतीचा विनाश करणारा 'किंग साइज हिरोशिमा' घडला तरी झुरळांवर त्याचा परिणाम होणार नाही. राखेच्या ढिगाऱ्याखालून 'मिशा झाडीत' ती निर्विकारपणे बाहेर येतील असे निवेदक सांगतो. झुरळांनी जणू येथे समग्र मानवी व्यवहाराला, मानवी संस्कृतीच्या

प्रगतीला क्षुल्लक ठरवले आहे. कवितेच्या सुरुवातीला अंधारात चाललेल्या झुरळाच्या क्षुद्र व्यवहारांचे निरीक्षण करणाऱ्या माणसाची जागा आता इतिहासावर मात करणाऱ्या झुरळाने घेतली आहे. आता तेच झुरळ मानवी व्यवहारांकडे निर्विकारपणे अधिक वरच्या स्थानावरून पाहते आहे. झुरळांचे मिशा झाडीत होणारे पुनरुत्थान किंवा किंग साइज हिरोशिमा हे शब्दप्रयोग यांतून मिश्किल सूर व गंभीर आशय यांचे परस्परांत मिसळणे दिसून येते.

झुरळांपुढे माणूस आता इतका नम्र झाला आहे, की पुढच्या छेदकात निवेदक झुरळाच्या वंशात जन्माला जावे अशी आकांक्षा व्यक्त करतो आहे. परंतु असे माणसाचे झुरळात रूपांतरण होणे सर्वांच्याच बाबतीत शक्य नाही. समग्र मानवी व्यवहारांच्या वैयर्थकतेचे, त्यातल्या कारुण्यपूर्ण शोकाचे हे दर्शन घडणे म्हणजे बुद्धाच्या साक्षात्कारी अवस्थेत पोहोचण्यासारखेच आहे. इथेच ग्रेगोर झाम्झा या काफ्काच्या नायकाचा संदर्भ कवितेत प्रवेश करतो.

३

द *मेटामॉर्फसिस* या सुप्रसिद्ध दीर्घकथेचा हा नायक आहे. कवितेतल्या त्याच्या उल्लेखाची अर्थपूर्णता समजून घेण्यासाठी या कथेचा संदर्भ थोडक्यात स्पष्ट करणे आवश्यक आहे. ग्रेगोर सर्वसामान्य माणसांसारखे अत्यंत कष्टाचे आयुष्य जगणारा, कुटुंबाची आर्थिक जबाबदारी वाहण्यासाठी फिरतीची नोकरी स्वीकारलेला, झोप व जेवणाची आबाळ होत असल्याने त्रागलेला आहे. एके दिवशी सकाळी उठल्यावर आपण एका मोठ्या झुरळसदृश कीटकात रूपांतरित झालो आहोत याची त्याला जाणीव होते. प्रथमतः जागरणामुळे असला काहीतरी दुःस्वप्नवजा भास आपल्याला होत असेल असेच त्याला वाटते. कामासंबंधीच्या चिंता वगैरेचा तो विचार करीत राहतो. लवकरच आपण खरोखरच अशा कीटकात रूपांतरित झालोय याची जाणीव त्याला होऊ लागते. कुटुंबातल्या इतर सदस्यांनाही ही गोष्ट स्पष्ट होते. त्याच्या या अवस्थेचे नेमके काय करायचे हे त्यांना कळेनासे होते. या रूपांतरणानंतर भोवतालचे जग आणि ग्रेगोर याच्यातील परस्पसंबंध पूर्णपणे बदलून जातात. प्रत्येकजण विविध प्रकारच्या भूमिका घेतो. बहीण खोलीतले फर्निचर हटवून त्याला कीटकाचेच जीवन अधिक चांगल्या प्रकारे जगू देण्यास मदत करू पाहते तर असे केल्यावर त्याची मानवी जीवनात पुन्हा दाखल होण्याची आशाच आपण खुडून टाकू असे त्याच्या आईला वाटते. वास्तविक ग्रेगोरला घराची आर्थिक स्थिती सुधारल्यावर त्रासदायक फिरतीच्या नोकरीतून मुक्त व्हायचेय. परंतु कीटकात रूपांतरित झालेल्या ग्रेगोरची ही स्वप्ने उद्ध्वस्त होत जातात.

नव्या अवस्थेत त्याला कुटुंबाकडून व भोवतालाकडून हेटाळणी, परकेपणा, स्वार्थलोलुपतेचा अनुभव येत जातो. प्रथम त्याची काळजी करणारी बहीण, आई इत्यादी पात्रेही त्याला नाकारू लागतात. तो घरातली एक अनावश्यक, दडवून, दडपून टाकावी अशी गोष्ट होतो. त्याच्या स्वातंत्र्याचा सर्वार्थाने संकोच होऊ लागतो. मानवी जगण्यात पुन्हा परतण्याचे त्याचे प्रयत्न असफल होतात. त्याउलट वडिलांच्या हिंसेचा तो बळी ठरतो. जगापासून तुटलेल्या ग्रेगोरचा त्यातच दुर्दैवी अंत होतो इत्यादी तपशील त्या कथेत आहे. मुख्य म्हणजे ग्रेगोरच्या मृत्यूनंतर त्याचे कुटुंबसदस्य काहीच घडले नाही इतक्या सहजपणे आपले नवे आयुष्य आनंदात पुढे चालू ठेवतात असा शेवट केला आहे.

ग्रेगोर हे पात्र आधुनिकतेने माणसाचे केलेले निःसत्त्वीकरण उलगडणारा साक्षात्कारी दृष्टिबिंदू देते. आधुनिकतेने निर्माण केलेली, माणसाला पूर्णपणे पिळून घेणारी कार्यसंस्कृती, साध्यासुध्या स्वप्नांचा पाठपुरावा करताना होणारी माणसांची ससेहोलपट, भेगाळत चाललेल्या कुटुंबसंस्थेमुळे प्रेम, आपुलकी वगैरे मूल्यांना पडलेल्या मर्यादा इत्यादी अनेक गोष्टींचे संदर्भ या कथेला आहेत.

*झुरळं* कवितेतील मेटामॉर्फेसिसचा संदर्भ एकप्रकारची आंतर-संहितात्मकता निर्माण करतो. वास्तविक *झुरळं*च्या निवेदकाचे जगणेही ग्रेगोरशी समांतरच आहे. थकून घरी येणे, झोप न मिळणे वगैरे गोष्टींच्या उल्लेखांतून ही समांतरता सहजपणे प्रस्थापित होते. परंतु झुरळंतील ग्रेगोरचा उल्लेख केवळ श्रुतयोजनपर नाही. ते मूळ कथेचे एक अर्थनिर्णयनही आहे. ग्रेगोरचे रूपांतरण व कवितेतल्या निवेदकाला जाणवलेली झुरळाची महात्मता या दोन्ही गोष्टी परस्परांजवळ ठेवल्यामुळे अर्थाची नवी संघटना आकाराला आली आहे. जगण्यातील निरर्थकतेला तत्त्वज्ञानाच्या पातळीवर प्रक्षेपित करताना सारंग एकीकडे बुद्धाचा उल्लेख करतात तर दुसरीकडे भारतीय तत्त्वज्ञान परंपरेतल्या चौऱ्याऐंशी लक्ष योनींतून प्रवास करणाऱ्या जीवाच्या कल्पनेचाही आधार घेतात. ग्रेगोरचे रूपांतरण व माणसाच्या मूलभूत दुःखाचे आकलन पचवणारा जाडा जपानी हसरा बुद्ध या दोन प्रतिमा झुरळाच्या रूपात परस्परांशी जोडल्यामुळे कवितेतील चिंतन अधिक गुंतागुंतीचे होते. आधुनिकतेने मानवी जीवनातून हिरावून घेतलेल्या प्रतिष्ठेची पुनःप्राप्ती करून घेण्यासाठी माणसाचे अशा साक्षात्कारी झुरळात रूपांतरण होणे आवश्यक आहे. ग्रेगोर नुसताच परात्म स्थितीत जखडून पडलेला शोकात्म नायक नाही. त्याला झुरळाच्या स्थितीत प्राप्त झालेली दृष्टी सारंगांना अधिक मूल्ययुक्त वाटते आहे. रूपांतरणामुळे कमनशिबी ठरलेला ग्रेगोर 'झुरळं' च्या पार्श्वभूमीवर नशीब फळफळलेला भाग्यवान ठरला आहे.

४

सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे या कवितेत रूढार्थाने रचनेचे प्रयोग नाहीत. मुक्तछंदाची मोडणीही महत्त्वाचा शब्द किंवा विशेषण वाक्याच्या शेवटी आणत परिणाम साधणारी, परिचित स्वरूपाचीच आहे. प्रत्येक छेदकात केलेल्या वेगवेगळ्या दृश्यनिर्मितीमुळे कवितेची रचना दृश्यांचे तुकडे परस्परांशी जोडून केलेल्या मोन्ताजसारखी झाली आहे. प्रत्येक दृश्य दुसऱ्या दृश्याशी अवस्थांतराच्या किंवा रूपांतरणाच्या सूत्राने बांधलेले आहे. झुरळाचा पारंपरिक पद्धतीने केवळ प्रतीकात्मक किंवा रूपकात्मक उपयोग करून ही कविता थांबत नाही त्याहून अधिक गुंतागुंतीचा आशय व्यक्त करण्याचा येथे प्रयत्न आहे. त्यासाठी झुरळांचे आपल्याला परिचित असणारे जग अपरिचित दृष्टिकोणातून सादर केले आहे. माणसामाणसांतील संबंधांचे, त्यातल्या दमनाचे, दहशतीचे व हिंसक क्रौर्याचे सूचन कवितेत आहेच, परंतु थेट तुलनेपेक्षा कवितेचा भर माणसांच्या जगाशी झुरळांच्या जगाचे जे विविध प्रकारचे सत्तासंबंध निर्माण होतात त्यांवर आहे. कवितेचा वर्ण्यविषय झालेली ही झुरळे कधी सामूहिक रूपांत, अनेकवचनात आहेत तर कधी एका विशिष्ट अवस्थेतल्या झुरळाविषयीचे विवेचन कवितेतील निवेदक करतो आहे. एकप्रकारे जगण्यातली सामूहिकता व वैयक्तिकता दोहोंनाही कविता स्पर्श करू पाहते. विलास सारंगांच्या लेखनात मानवी जगण्याच्या सार्थकतेविषयीचे, त्यातल्या मूल्यात्मकतेविषयीचे अत्यंत गंभीर प्रश्नही सामान्य वाटणाऱ्या दैनंदिन घटनाप्रसंगातून उभे केले जातात. एरव्ही सर्वसामान्य वाटणाऱ्या व्यवहारांना तत्त्वचिंतनाच्या पातळीवरून पाहणारी नवी दृष्टी व भान जागवण्याचा तसेच समाज, व्यक्ती व समष्टी यांच्यातील संबंधांविषयी अंतर्मुख करणारे प्रश्न उपस्थित करण्याचा या कवितेचा प्रकल्प यशस्वी ठरला आहे असे आपल्याला खात्रीने म्हणता येते.

**संदर्भ**


१. सारंग, विलास (१९८६) : *कविता १९६९-१९८४*, मौज प्रकाशन, मुंबई, पृष्ठे ३०-३२.

२. Kafka, Franz (1952) : 'The Metamorphosis' in *Selected Short Stories of Franz Kafka*, Translated by Willa & Edwin Muir, The Modern Liberary, New York, pp.19-89.

# भाष्य

संभाषित

# बलात्काराचे मूळ वर्चस्ववादातच

**प्रतिमा जोशी**

पत्रकार, कार्यकर्ता व कथाकार
महाराष्ट्र टाइम्स, मुंबई
pratimajk@gmail.com


संभाषित

बलात्कारासारखे गंभीर गुन्हे हे केवळ अतिरिक्त वैयक्तिक वासनेपोटी केले जातात, हा आपल्याकडचा एक लोकप्रिय गैरसमज आहे. बलात्कार ही केवळ त्या त्या व्यक्तीशी निगडित मानसिक विकृती आहे असेच समजून चालले, की मग बलात्कारामागच्या व्यापक कारणांकडे आणि त्यामागील राजकारणाकडे यथेच्छ डोळेझाक करता येते.

बलात्कारामागील राजकारण हा शब्दप्रयोग अनेकांना एकतर अनाठायी वाटेल किंवा मानवणार नाही. ज्यांना अनाठायी वाटेल त्यांची गणना शिक्षित अज्ञानी लोकांत करून एकवेळ त्यांना समजून घेता येईल आणि थोडे विचार करायला भाग पाडून त्यांना या राजकारणाचे अस्तित्व जाणवून देण्यात आपल्याला यशही येऊ शकेल. प्रश्न ज्यांना हे मानवणार नाही त्यांचाच आहे आणि काळजी करण्यासारखी बाब म्हणजे अशा मंडळींची शासन, प्रशासन, अर्थसत्ता, सांस्कृतिक अधिराज्य आणि जातिव्यवस्थेची उतरंड या सर्वांवर विलक्षण अशी घट्ट पकड आहे. बलात्कारांमागील राजकारणाचा गुंतागुंतीचा सामाईक पट समोर न येण्यात त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. हे हितसंबंध जपण्यासाठीच बलात्काराचा प्रश्न हा व्यक्तीच्या विकृतीशी जोडला, की सारे कसे सोपे होऊन जाते! माध्यमे मानसशास्त्रज्ञांच्या मुलाखती प्रसिद्ध करून बलात्कारामागची व्यक्तीची मानसिकता यावर भारंभार चर्चा करतात. स्त्रीसंघटना पुरुषी मनोवृत्ती आणि त्याविरोधातील कायदे यापुरत्या चर्चेत अडकून जातात. शासन बलात्काऱ्याला कडक शिक्षा केली जाईल, अशी घोषणा करून मोकळे होते आणि समाज परिस्थिती किती बिघडत चाललीय अशी हळहळ व्यक्त करत मुलीबाळींवरील निर्बंध आणखी कडेकोट कसे होतील याबाबत दक्ष होतो. यातूनच मग मुली/स्त्रियांचे पेहराव, त्यांच्या वावरण्याच्या वेळा, चित्रपट/नाटक/मालिका यांतील स्त्री- पुरुषांच्या चित्रणातील अश्लीलता यावर टीकास्त्र सुरू होते. कधी कधी लोक मोठ्या संख्येने रस्त्यावरही उतरतात. काही काळ सारे ढवळून निघते. मात्र तरीही बलात्कारांची मालिका चालूच राहते. दर खेपेला बलात्काराच्या प्रकरणातील क्रौर्य अधिक वाढलेले दिसते. शासन, संघटना, समाज हे पुन्हा क्रियाप्रतिक्रियांच्या त्याच चक्रात सापडतात. मूळ दुखण्याचे निदान आणि त्यावर आवश्यक ते उपचार केल्याशिवाय या चक्राची गती कमी करता येणार नाही.

**...मूळ वर्चस्ववादात**

बलात्कार ही केवळ व्यक्तीची विकृती आहे इतक्याच मर्यादित भ्रमात न राहता ते दमन आहे, शोषणाचे हत्यार आहे, या अंगाने आपण त्याकडे




पाहणे गरजेचे आहे. अगदी अलीकडील हाथरस बलात्कार प्रकरण तपासले तर हा मुद्दा लख्ख स्पष्ट होईल. अतिशय अमानुष असे हे प्रकरण बलात्कार आणि हत्या अशा दुहेरी अघोरी कृत्यांनी रक्तलांच्छित झाले आहे. असहाय स्त्री आणि तिला उपभोगाची वस्तू समजणारे विकृत पुरुष हा त्याचा प्राथमिक पैलू आहे, परंतु तपशिलाची चिकित्सा करत खोलात उतरले तर काय काय आढळते? सर्वप्रथम, बलात्कारी पुरुष हे तथाकथित उच्च जातीचे आणि स्त्री ही उतरंडीतील खालच्या पायरीवर असलेल्या शूद्र जातीची आहे. दुसरे वास्तव हे, की गावची बहुसंख्या असलेल्या सवर्ण समाजात बलात्कारी पुरुषांबद्दल संताप दिसत नाही. म्हणजे एका वेगळया अर्थाने त्यांचे मूक समर्थन

संभाषित

आहे. तिसरी गोष्ट समोर आली ती ही, की प्रशासन आणि पोलीसही पीडित स्त्री आणि तिच्या कुटुंबाप्रती फारशी सहानुभूती दर्शवत नाहीत. त्यांनी तसे करावे यासाठी समाजातील सहृदय आणि संवेदनशील घटकांना सतत आवाज उठवत राहावे लागले आहे. चौथी बाब ही, की पीडितेचे नाव जाहीर होऊ नये असे कायदा सांगत असतानाही माध्यमांनी बळीत मुलीचे नाव अगदी प्रथमपासून जाहीर, प्रसिद्ध केले आहे. दुर्बळ घटकांतील माणसांना इज्जत नसते, असाच जणू त्यांचा समज असावा. पाचवी बाब ही, की तिला तातडीचे उपचार आणि वैद्यकीय सुविधा वेळेत पुरविण्याची गरज एकंदरच यंत्रणेला वाटलेली नाही. सहावा मुद्दा आरोपी उच्च जातीचे असल्याने ते खालच्या जातीच्या हातचे पाणीही पीत नाहीत, तर ते त्या जातीतील स्त्रीवर बलात्कार कसा करतील हा त्या गावातल्या सवर्ण जातीच्या लोकांनी केलेला युक्तिवाद! आणि सर्वात महत्त्वाचा सातवा मुद्दा, हे संपूर्ण प्रकरण उत्तर प्रदेश सरकारने ज्या प्रकारे हाताळले किंवा हाताळत आहेत, ती असंवेदनशीलता ! हे सर्व मुद्दे वर्चस्ववाद या एकाच मनोवृत्तीकडे निर्देश करतात.

खरे तर हाथरस हे काही वर्चस्ववादी समाजव्यवहारांचे एकमेव उदाहरण नाही. बदायू, उन्नाव, लखनपूर बाथे, खैरलांजी... भारताच्या बहुतेक राज्यांत हा पॅटर्न दिसून येतो. वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्ह्यू डेटानुसार भारतात दर एक लाख लोकसंख्येमागे २२ हजार १७२ बलात्कार नोंदवले जातात. भारताची लोकसंख्या १३७ कोटींच्या वर आहे हे लक्षात घेतले तर याची भयाणता जाणवावी. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीप्रमाणे २०१९मध्ये दिवसाला सरासरी ८७ इतके बलात्काराचे प्रमाण नोंदवले गेले. आता अगदी नेमक्या मुद्द्याकडे वळायचे, तर ब्युरोच्याच आकडेवारीनुसार अनुसूचित जाती आणि जमातीच्या स्त्रियांवर झालेल्या बलात्कारांचा आकडा २०१६मध्ये ४० हजार ७४३ होता, तो २०१८मध्ये ४२ हजार ७४८वर गेला. गेल्या वर्षभरातील घटना पाहिल्या तर २०१९मध्ये तो आणखी वाढला असण्याची शक्यता आहे. ही आकडेवारी फक्त अनुसूचित जातिजमातींसंदर्भात आहे. भारतीय जातिव्यवस्थेत अस्पृश्य नसलेल्या परंतु खालच्या समजल्या जाणाऱ्या असंख्य जाती आहेत. उत्पादनव्यवस्थेत, संपत्तीच्या वाटपात, सामाजिक दर्जात त्यांचे स्थान अतिशय कमकुवत आणि दुय्यम दर्जाचे आहे. या जाती उत्पन्नाच्या छोट्यामोठ्या साधनांवर किंवा शेतमजूरी/मोलमजूरी करून आपला उदरनिर्वाह करतात. शेती, व्यापार यांवर परंपरागत जम बसवलेल्या जातींच्या वर्चस्वाखाली त्यांचे सामाजिक आणि आर्थिक जीवन चालू असते.

संभाषित

अनुसूचित जातिजमाती अर्थातच त्यांच्यापेक्षाही बदतर आयुष्य जगत असतात. अर्थकारण, राजकारण आणि समाजकारण यांच्या नाड्या ज्यांच्या हाती आहेत अशा मोजक्या जाती एका बाजूला आणि त्यांच्या पुढारपणाखाली जगणाऱ्या अन्य जाती एका बाजूला अशी विभागणी दिसते. वरिष्ठ जातींची जरब बसविण्याची एक पद्धत विकसित होत गेलेली आहे. त्यात किती मेहनताना मिळावा इथपासून ते गावच्या/राज्याच्या निर्णयांमध्ये किती सहभाग असावा इथपर्यंत कोणत्याच गोष्टींवर कष्टकरी, निम्न जातिवर्गाचा कसलाही अधिकार नसतो. एखाद्या अन्याय्य वाटणाऱ्या बाबीवर काही विचारणा केली, तरी तो उपमर्द समजला जाऊन जिवावर बेतण्याच्या घटना भारतात दुर्मीळ नाहीत. दुबळ्या जातिवर्गाला त्याची पायरी दाखवून देण्यासाठी, धडा शिकवण्यासाठी दुबळ्यापेक्षाही दुबळ्या समजल्या जाणाऱ्या त्यांच्या स्त्रियांच्या अब्रूला हात घालणे इथल्या उच्च जाती गैर मानत नाहीत. ज्या प्रथांना आपण बलात्काराच्या वर्गवारीत गणत नाही अशा देवदासी, जोगतिणीसारख्या प्रथांकडे पाहा. निम्न जातींतील कोणताही आवाज नसलेल्या स्त्रियांवर प्रथेच्या नावाखाली रोजच्या रोज बलात्कार होत असतात. शरीरविक्रय लादल्या गेलेल्या स्त्रियांबाबतही बव्हंशी हेच वास्तव दिसते.

सर्व प्रकारची सत्ता आणि संपत्ती यांचे विषम वाटप असलेल्या व्यवस्थेत नाहीरे वर्ग संख्येने मोठा असला, तरी त्यांच्यावर आहे रे वर्गाची मजबूत पकड आहे आणि ती सैल होऊ नये यासाठी धाकदपटशा, हिंसा यांच्या सर्व वर्गवारी अवलंबिल्या जातात. ज्या समूहाला टाचेखाली ठेवायचे आहे, त्यातील स्त्रियांवर अंगमेहनतीबरोबरच लैंगिक दास्याची बळजोरी हा सर्व जगभरच आढळणारा पॅटर्न आहे. दासाच्या कष्टाबरोबरच त्यांच्या स्त्रियांवरही हुकुमत गाजवण्याची मानसिकता आढळून येते. त्यातूनच या स्त्रियांवर लैंगिक हिंसा लादली जाते आणि बरेचदा त्याची वाच्यताही होणार नाही, झालीच तर कायद्याचे हात आपल्यापर्यंत पोहोचणार नाहीत याची पुरेपूर व्यवस्था केली जाते. यात अनुसूचित जातिजमातींतील स्त्रियांचे तर दुहेरी आणि अधिक तीव्र स्वरूपाचे शोषण होते.

या हिंसेचे अधिक विस्तारित रूप युद्ध, वांशिक दंगली यांत आणखी विक्राळ रूप धारण करताना दिसते. शत्रूला नामोहरम करण्यासाठी, त्याला अद्दल घडवण्यासाठी, सूड उगवण्यासाठी, आपले स्वामित्व जाहीर करण्यासाठी, आपले जेतेपद सिद्ध करण्यासाठी शत्रूच्या स्त्रियांवर बळजोरी करणे, त्यांची खरेदीविक्री करणे असे जालीम उपाय योजले जातात. स्त्रिया

संभाषित

या सॉफ्टेस्ट टारगेट ठरतात. याची असंख्य उदाहरणे भारतात आणि जगभरच दिसतात. काश्मीर, ईशान्य भारतातील अशांत सीमावर्ती राज्ये येथील गेल्या काही वर्षांतला इतिहास पाहिला तर तेथील स्त्रियांचे आक्रंदन आपल्याला दिसल्याशिवाय राहणार नाही. 'कम, रेप अस' असे उद्वेगाने ओरडत नागव्याने निदर्शने करणाऱ्या स्त्रिया भारतीयच आहेत हे आपण सारेच सोयिस्करपणे विसरतो. दंगली आपल्या देशाला नव्या नाहीत. विशेषकरून हिंदूमुस्लीम दंगलींना तर शतकांचा संदर्भ आहे. हा दंगलींचा इतिहास एक सुजाण नागरिक म्हणून अभ्यासला, तर दंगलींत उसळलेल्या हिंसेत सर्वाधिक मोल स्त्रियांना द्यावे लागलेले दिसेल. गेल्या काही वर्षांत परधर्मीय स्त्रियांच्या विटंबनेला सत्तेची ऊब लाभलेला राजकीय आश्रयही मिळताना दिसत आहे. त्यामागे मुस्लीम हे शत्रू असून त्यांच्या स्त्रिया जर तावडीत सापडल्या, तर त्यांना तसेच सोडून देणे ही 'सद्गुण विकृती' असल्याचे सांगणाऱ्या विखारी फॅसिस्ट तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे असे म्हणण्यास वाव आहे.

या सगळ्या पटापलीकडे असलेले सर्वसामान्य आयुष्य जरी पाहिले, तरी बलात्काराचे कुटुंबव्यवस्थेतील अदृश्य तसेच शहरी बकाल आणि विद्रूप राजकारण आपल्याला दिसू शकते. बहुतांश बलात्कारांमागे संबंधित स्त्रीला, तिच्या कुटुंबीयांना, ती ज्या जातिसमूहाची आहे त्या समूहाला धडा शिकवण्याची, उद्ध्वस्त करण्याची मानसिकता दिसते.

बलात्काराची आणखी एक वर्गवारी विकासाचा असमतोल आणि शहरी गरिबीत आणि भणंगपणातही आढळून येते. गावांतून परागंदा होऊन शहरात स्थलांतरित झालेला आणि कोणतीही रोजगारनिश्चिती नसलेला, बकाल जिणं जगणारा, कसलाही आगापिछा नसलेला एक वर्ग देशांतील मोठ्या तसेच नव्याने उभ्या राहत असलेल्या महानगरांमध्ये आहे.या वर्गातील स्त्रिया लैंगिक हिंसेच्या बळी ठरताना दिसतात तर दुसरीकडे बऱ्याच प्रकरणांमध्ये पुरुष आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहिलेले दिसतात. शक्ती मिल प्रकरणात, दिल्लीतील निर्भया प्रकरणात हे प्रकर्षाने दिसून आले. बलात्काराच्या प्रश्नाला अनेक पैलू असल्याचेच यातून सिद्ध होते. महानगरी आणि आता तर ग्रामीण भागातही तंत्रज्ञानाचा विळखा शालेय विद्यार्थ्यांपासून सर्व वयाच्या लोकांना पडलेला आहे. सोशल मिडिया, पोर्नोग्राफी यांच्या सापळ्यात सापडत चाललेल्या समाजात बेफिकिरी, उर्मटपणा, आक्रमकता, परस्परांविषयी आदर नसणे या अवगुणांबरोबरच पोर्नोग्राफीच्या माध्यमातून हिंसक लैंगिक विकृती आणि त्याच्या अतिरेकाने येणारा बधिरपणा यामुळे संवेदनाहीन होत




चाललेल्यांची संख्या वाढती आहे. वरवर माणूस आणि डिजिटल उपकरणे हा साधा विषय वाटला, तरी या सर्व मायाजालामागे बाजारकेंद्री अर्थव्यवस्था, जागतिक अर्थव्यवस्था आपल्या मुठीत ठेवण्याची ईर्ष्या आणि त्यासोबतीने राजकीय सत्तेची मक्तेदारी प्रस्थापित करण्याचे अवाढव्य चक्र आहे. हे सर्व व्यवहार वर्चस्ववादाचीच उदाहरणे आहेत.

मनुष्यमात्रातील हिंसेचे, वर्चस्ववादाचे टोकाचे दर्शन बलात्कारांत दिसते. खरे तर नीती अनीतीच्या आणि सामाजिक बंधनांच्या घट्ट विळख्यात माणसाचे एकूणच लैंगिक व्यवहार आणि समज ही निकोप राहिलेली नाही. प्रजोत्पादनापुरताच लैंगिक व्यवहार करणाऱ्या प्राणिपक्षी जगताचा

नैसर्गिक वारसा त्याच्याकडे नाही. दुसरीकडे लैंगिक संबंधांबाबत कमालीचा अडाणीपणा अस्तित्वात आहे. या क्रियेतील दोन्ही व्यक्तींची संमती, त्यासाठी आवश्यक असणारी भावनिक जवळीक, परस्परांबद्दलचा आदर आणि प्रेम या मेंदूशी निगडित बाबीही त्याने बहुतांशी झुगारून दिलेल्या दिसतात. कोणत्याही अर्थाने मनुष्यमात्रांचे जगणे स्वाभाविक राहिलेले दिसत नाही... मग ते अविकसित देशांतील मागास समूहांचे असो की भौतिक भरभराटीने वाकलेल्या, कशाचीही कमतरता नसलेल्या समूहांचे असो. माणसामधली सूडभावना, वर्चस्वाची वृत्ती आणि आपल्यापेक्षा दुबळ्यावर कब्जा करण्याची लालसा यातून त्याने नैतिक- अनैतिकतेचे सापळे तर रचलेच, पण समोरच्याला नामोहरम करण्याची अनेक तंत्रे विकसित केली. बलात्कार हे असेच विकृत तंत्र आहे.

संशोधन

# ऑनलाईन शिक्षण : सद्य:स्थितीतला एक गोंधळ

श्रुती पानसे

शिक्षक, लेखक, संशोधक
न्यूरॉन्स ॲक्टिव्हिटी ॲन्ड रिसर्च सेंटर, पुणे
drshrutipanse@gmail.com

'सर्वत्र' ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. या ऑनलाईन शिक्षणामध्ये शाळा – कॉलेज आणि इतर कोर्सेसचा समावेश होतो. यात कॉलेज आणि इतर कोर्सेस यांचा विचार थोडा वेगळा आहे. कारण हा वयोगट वेगळा आहे. त्यामुळे या तिन्ही गोष्टींकडे वेगवेगळया दृष्टिकोणातून बघावं लागेल. नव्या शैक्षणिक धोरणातल्या एका मुद्द्यानुसार (२०१९) देशात डिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे, असा विचार मांडला गेला होता. त्यावेळी त्या मुद्द्याला विरोध करायचे फारसे कारण नव्हते. कारण शिक्षणात संकल्पना स्पष्टीकरणासाठी काही प्रमाणात ई-लर्निंगचा उपयोग होतो, हे लक्षात आले आहे. परंतु हे ई-लर्निंग शाळेच्या वातावरणात, शिक्षक - प्राध्यापकांच्या देखरेखीखाली, मोठ्या स्क्रीनवर , आणि अत्यंत कमी प्रमाणात दिलं जात होतं. नव्या तंत्रज्ञानाला विरोध करण्याचं काहीच कारण तेव्हा नव्हतं.

पण आता तर संपूर्ण चित्रच बदललं आहे. शाळा – कॉलेजेमध्ये विद्यार्थ्यांच्या गर्दीमुळे, समूहाने एकत्र आल्यामुळे, शेजारी बसल्यामुळे, एकमेकांना स्पर्श केल्यामुळे आणि वाहतुकीमुळे कोविड संसर्गाचा धोका वाढला हे लक्षात आलं म्हणून दहावीचा शेवटचा पेपर रद्द करून, कोरोनाचा फैलाव होऊ नये म्हणून शाळा बंद करण्यात आल्या. कॉलेजच्या परीक्षा अर्धवट झालेल्या असल्या तरी त्या थांबवण्यात आल्या. परीक्षा रद्द करण्यात येऊन सर्वांनाच वरच्या वर्गात पाठवण्यात आलं. संसर्ग थोडा कमी झाल्यावर ज्या देशांनी शाळा सुरू केल्या, तिथे संसर्ग जोरदार वाढला आणि त्यामुळे सर्वच देशांमधल्या सर्वच शिक्षणसंस्था बंद पडल्या.

या निमित्ताने शिक्षणक्षेत्रात झालेला सर्वात मोठा बदल म्हणजे सुरुवातीच्या काळात शालेय मुलांना घरी बसून, लॅपटॉप – मोबाईलद्वारे शिक्षण सुरू झालं. शाळा आधी सुरू झाल्या. त्यानंतर काही महिन्यांनी कॉलेजेस ऑनलाईन सुरू झाली. अशा प्रकारच्या शिक्षणाची सुरुवात आधी शाळांपासून झाली. त्यामुळे यावरची मतमतांतरं आणि त्याचे फायदेतोटे – अगदी फीच्या प्रश्नांसह – आधीच विचार करून झाले होते. त्यामुळे कॉलेजमधलं ऑनलाईन शिक्षण शांतपणे सुरू झालं.

ज्याप्रमाणे घरातली मोठी माणसं वर्क फ्रॉम होम करतात, तेच तत्त्व वापरून मुलांसाठी ऑनलाईन शिक्षण सुरू झालं. शासनाने विविध प्लॅटफॉर्म्स वापरून मुलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. काही शाळा आणि कॉलेजेसनी सुज्ञपणे अत्यंत कमी वेळ प्रत्यक्ष स्क्रीनसमोर बसण्यासाठी ठेवला आणि त्याऐवजी अनेक कल्पक उपक्रम मुलांकडून करवून घेण्यावर भर दिला. यामुळे सतत स्क्रीनसमोर बसावं लागत नाही आणि विविध उपक्रमात गुंतून राहिल्यामुळे त्यांच्या बुद्धीला चालनाही मिळते.

संवादिनी

काही संस्थांनी मात्र सरधोपट मार्गाने वर्ग चालवण्याचा प्रयत्न केला. विशेषत: शालेय आणि अकरावी- बारावी. तासामागून तास शिकवलं. मुलांकडून अभ्यास करवून घेतला. त्यांनी शिस्त राखावी म्हणून अनेक बाबतीत सक्ती केली. भरपूर लेखी अभ्यास देऊ केला. या सगळयात पालकवर्ग मुलांना दामटून स्क्रीनसमोर बसवण्यात गुंतला. बालवाडीतल्या छोट्या मुलांनाही स्क्रीनसमोर बसण्याची सक्ती झाली.

हे सर्व अशांच्या घरी घडून आलं, ज्यांच्या घरात ई-गॅझेट्स आहेत. स्वतंत्र खोली आणि वायफाय आहे. ज्यांच्या घरात यापैकी एक गोष्ट किंवा काहीच नाही, तिथल्याही समस्या फार मोठ्या आहेत.

सर्वदूर सर्वांकडे ऑनलाईन सुविधा नाहीत. तरीही ऑनलाईन शिक्षणाचा आग्रह धरला गेला. ग्रामीण, आदिवासी भाग तसेच शहरी गरीब विद्यार्थ्यांना वीजेची उपलब्धता, इंटरनेट सुविधा, स्मार्ट फोनची सुविधा अशा अनेक मुद्‌द्यांचा विचार केला नाही. घरात मोबाईल, लॅपटॉप नसेल, पुरेसा नेटपॅक घेण्याइतके पैसे नसतील. रेंज नसेल अशा घरांनी शैक्षणिक विषमता अनुभवली. ज्यांना ऑनलाईन शिक्षण मिळत नाही, त्यांच्या मनात येणारे न्यूनगंड आणि त्यामुळे शाळेत शिकणाऱ्या लहानग्यांनी आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचलणं हा यातला सर्वात गंभीर आणि कधीही भरून काढता येणार नाही असा दुष्परिणाम आहे. आपण आपल्या मुलांना सर्व सोयी उपलब्ध करून देऊ शकत नाही, यामुळे पालकांमध्ये पराकोटीची अपराधभावना निर्माण झाली.

यामुळे अशा मुलांसाठी शिक्षण या हक्काचा संकोच झाला. अर्थात पाठ्यपुस्तकं सर्वांपर्यंत पोहोचली असली तरी ऑनलाईन शिक्षणामुळे शैक्षणिक विषमता वाढली. ती उघड उघड सर्वांनाच दिसून आली. काहींपर्यंत शिक्षक पोहोचत आहेत, काहींपर्यंत नाही हे दिसून आलं. घरच्या गरिबीमुळे ऑनलाईन शिक्षण घेता येऊ शकत नाही याचा तीव्र मानसिक परिणाम मुलांवरही झाला आणि पालकांवरही झाला. कारण इंटरनेट सुविधा नाहीत, या कारणासाठी काही मुलांनी आत्महत्या केल्या. याच कारणासाठी काही गरीब पालकांनीही आत्महत्या केल्या. अशा परिस्थितीत ऑनलाईन अध्ययनाचा हेतू साध्य झाला नाही, हे दिसून येतं.

या परिस्थितीत गावाकडून शहरात आलेले अनेक विद्यार्थी आणि काही शिक्षकही गावाकडे पुन्हा गेल्याने वर शाळांच्या संदर्भात चर्चिलेले अनेक मुद्दे कॉलेज विद्यार्थ्यांच्या बाबतीतही घडले. घडत आहेत. या वयाच्या बहुतांश विद्यार्थ्यांकडे मुळात किमान एक मोबाईल होताच. त्यामुळे तो प्रश्न या वयाच्या मुलांच्याबाबतीत आला नाही. त्यावर पुरेसा नेटपॅक घालण्याची गरज मात्र होती. परंतु सर्वात मोठी समस्या रेंजची भेडसावते आहे.

संभ्रमित

मुलांना ऑनलाईन शिकवलं तरी व्हिडिओ आणि ऑडिओ म्यूट करूनच शिकावं लागतं. या सगळ्या प्रकारात एक प्रकारची मोठी मर्यादा येते. त्याहीपेक्षा जेव्हा मुलांच्या परीक्षा घेतल्या जातात तेव्हा अवघड होतं. एमसीक्यू पद्धतीच्या या परीक्षा असल्यामुळे सोपं झालंय. 'परीक्षा घेतली' असं म्हणण्यापुरती ही परीक्षा असली तरी त्यानिमित्ताने मुलं काहीतरी अभ्यासाचं पुस्तक समोर धरतात, ही त्यातली जमेची बाजू आहे. मात्र परीक्षा घेताना टाईम स्लॉट ठेवलेला असतो. त्याच वेळात रेंज गेली, कमी झाली आणि त्यामुळे वेळेत सबमिट करता आलं नाही, तर त्याचा मोठाच ताण संवेदनशील मुलामुलींवर होतो. अगदी वायफाय असलेल्या घरांमध्येसुद्धा हे घडतं. त्या वेळात परीक्षेतील प्रश्न सोडवायचे की रेंजचे प्रश्न सोडवायचे, असं संकटच मुलांसमोर उभं राहतं. त्यामुळे असे प्रश्न सोडवावे लागणार आहेत.

हाच भाग शिक्षकांच्या बाजूनेही घडून येऊ शकतो. घरात शांतता, घरातले आणि इतर आवाज नसणं, रेंज असणं आणि त्यांनी शिकवणं हे त्यांच्यासाठीसुद्धा अवघड असतं. आहे.

वास्तविक, आतापर्यंत मुलांनी जास्त मोबाईल बघू नये यासाठी सर्वांनी आटोकाट प्रयत्न केले आणि आता काळ असा आहे की पालक आणि शिक्षकच मुलांच्या हातात मोबाईल देत आहेत. त्यावर शिकावं म्हणून मुलांवर लक्ष ठेवून आहेत आणि मुलं मात्र म्यूट करून , व्हिडिओ स्टॉप करून त्यापासून पळ काढत आहेत. किंवा असं चित्र घरांघरांमध्ये दिसून आलं.

मोबाईल हे यंत्र मुळातच घातक आहे. जेवढा कमी वापर असेल तेवढं योग्य आहे. *अमेरिकन ॲकडमी ऑफ पेडियाट्रिक* यांनी प्रत्येक वयोगटात किती वेळ मोबाईल हाताळावा, यासाठी वेळ मर्यादा आखून दिली आहे. तरीही आपल्याकडे शिक्षणासाठी तो मुलांच्या हाती दिला गेला.

या सगळ्या प्रकारामुळे आधीच जास्त असलेला स्क्रीन टाईम आता अतोनात वाढला आहे. आपल्या मेंदूला नवे अनुभव हवे असतात, असं म्हटलं तरी त्यालाही काही प्रमाण आहे. दर मिनिटा दोन मिनिटाला विविध विषयावरच्या पंचवीस-तीस पोस्ट्स वाचल्या आणि तितकेच फोटो बघितले तर तासाभराने थकवा येणारच आहे. कारण मेंदूवर किती आणि काय काय आदळणार?

एक तासभर सोशल मीडियावर घालवणाऱ्या व्यक्तीला असं विचारलं की काय काय बघितलंस? काय वाचलंस? काय आठवतंय? फारसं काहीच हाताला लागणार नाही. कारण मेंदूने ते सर्व फार वरवर पाहिलं आहे. डोळ्यांनी मेंदूपर्यंत सर्व गोष्टी पोहोचवल्या; पण तारतम्याने मेंदूने त्या स्वीकारल्याच नाहीत. आपल्या मेमरीवरचा कचरा वाढवलेलाच नाही. कारण त्याला ते

महत्वाचं वाटलेलं नाही. पण यामुळे त्याच्यावर खूप काम पडलं आहे. हेच ऑनलाईन शिकणाऱ्या मुलांच्या बाबतीत म्हणता येणार नाही का?

असं काहीही असलं तरी या नव्या परिस्थितीत प्राध्यापकांना स्वत:ला बदलावं लागणार आहे. शिक्षकवर्ग हा टेक्नोसॅव्ही असला तरी अशा पद्धतीने संपूर्ण शिकवण्याचं तंत्र शिक्षकांना - प्राध्यापकांना अवगत असण्याचं काहीच कारण नव्हतं. त्यामुळे त्यांनाही या डिव्हाईसेसशी जुळवून घेणं, समोर कोणीही नसताना कॅमेऱ्यात बघून शिकवणं. व्हिडिओ किंवा पीपीटी करण्यासारख्या गोष्टी शिकून घ्याव्या लागल्या आहेत, त्यात नवनवे बदल करावे लागणार आहेत.

अशा काही गोष्टी अध्यापनात आणाव्या लागणार आहेत.

- मल्टिमीडियाचा जास्तीत जास्त वापर करावा लागणार आहे. त्यात संबंधित विषयावरील क्लिप्स, गाणी, गोष्टी यांचा समवेश करून अवधानक्षमता वाढवणं.
- स्वत: व्हिडिओ तयार करायला शिकणं किंवा तशा प्रकारचं काम करणाऱ्या व्यक्तींकडून व्हिडिओज बनवून घेणं.
- ईमेलचा वापर करून आधीच विषय आणि सर्व माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणं आणि प्रत्यक्षात फक्त चर्चा घेणं.
- मुलांच्या डोक्याला जास्तीत जास्त चालना देण्यासाठी, त्यांनी बोलायला प्रवृत्त व्हावं यासाठी त्यांना विषय देणं.
- संबंधित विषयावरची चित्रं, पोस्टर्स तयार करण्यासाठी प्रोत्साहन देणं, निबंधलेखन, प्रश्नावली यावर भर देणं.

अशा प्रकारे विविध कल्पना वापरून क्लासरूममध्ये सर्वांना व्यक्त व्हायला संधी देणं. यामुळे अभ्यासातला उत्साह टिकून राहण्यासाठी काही एक मदत होईल.

**शिक्षणात कंपन्या**

शिक्षण देण्याच्या या कामात पूर्वीपासूनच काही कंपन्या होत्या, पण आता थेट प्लॅटफॉर्म्स या कंपन्यांनी उभे करून दिल्यामुळे या कंपन्यांना 'विद्यार्थी' हा नवा ग्राहकवर्ग मिळाला. या ग्राहकवर्गाची संख्या काही लाखांच्या घरात आहे. याचा परिणाम खाजगीकरण वाढून कोणतीही कंपनी शिक्षणक्षेत्रात येते आहे, अशा जाहिराती दिसायला लागल्या आहेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक कन्टेन्ट निर्माण करणाऱ्या या कंपन्या मार्केटिंगच्या प्रभावाखाली कोणता मजकूर निर्माण करतील यावर नियंत्रण कोण ठेवणार, या प्रश्नाचं उत्तर वेळ न घालवता शोधावं लागेल. असे काही ठळक बदल झालेले आपल्याला दिसून येतात. एकदा शाळा व्यवस्थित सुरू झाल्या की ऑनलाईन शिक्षण थांबेल असं आता तरी वाटतं आहे. किंवा कदाचित पूरक म्हणून, काही संकल्पना स्पष्टीकरणासाठी ते चालू राहील. जसं पूर्वी ईलर्निंगच्या स्वरूपात माफक प्रमाणात चालू होतं.

संभाषित

**ऑनलाईन शिक्षणाचे मन- मेंदू- शरीरावर परिणाम**

कोविडच्या या काळात जे 'ऑनलाईन शिक्षण सुरू झालं त्याचे मुलांवरचे दुष्परिणाम दिसायला अजून काळ जावा लागेल. पण पुढच्या काळात जर मोबाईलचं नको ते व्यसन लागलं, चिडचिड वाढणं, अस्वस्थता वाढणं हे घडून आलं, डोळ्यांवर दुष्परिणाम झाले, तर तो या काळाचा परिणाम असेल. शिक्षणासारखी सकारात्मक गोष्ट करायला गेलं आणि डोळे- मेंदू- शारीरिक क्षमता यावर दुष्परिणाम- यासारख्या नकारात्मक गोष्टी ओढवून घेतल्या, असं व्हायला नको.

इथे दोन धोके संभवतात. मोबाईलचं नको ते व्यसन लागू शकतं. चिडचिड वाढणं, अस्वस्थता वाढणं हे घडून येऊ शकतं. डोळ्यांवर दुष्परिणाम होऊ शकतो. येत्या सहा- आठ महिन्यांनंतर नेत्रतज्ज्ञांकडची निरीक्षणं तपासायला हवीत.

मेंदूतला निर्णयक्षमतेसाठी आवश्यक असलेला ग्रे मॅटर हा भाग संकुचित होऊ शकतो. ही खूपच मोठी समस्या आहे.

दुसरा अदृश्य धोका- एका जागी, स्क्रीनसमोर बसून राहण्याच्या सवयीमुळे या पुढच्या काळात मैदानी खेळांसाठी मुलांनी आपणहूनच तयारी न दर्शवणं हे आगामी काळात घडून येण्याची शक्यता आहे.

- टीव्हीच्या तुलनेत मोबाईल, टीव्हीचं डोळ्यांपासून अंतर कमी असणं, डोळ्यांवर मोबाईलमधून बाहेर पडणाऱ्या किरणांचा घातक परिणाम होणं. यामुळे पुढच्या काळात डोळ्यांवर येणाऱ्या ताणामुळे, डोळे कोरडे होणे, चष्मा लागणे, यासारखे आजार वाढण्याची दाट शक्यता आहे.

- *अमेरिकन ॲकडमी ऑफ पेडियाट्रिक* यांनी प्रत्येक वयोगटात किती वेळ मोबाईल हाताळावा, यासाठी वेळ मर्यादा आखून दिली आहे. त्यानुसार,

- दोन वर्षांखालील मुलांना मोबाईल मुळीच द्यायचा नाही.
- तीन ते पाच वयाच्या मुलांना एक तासाच्या वर कोणतीही इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स द्यायची नाहीत.
- त्यावरच्या मुलांनी दोन तासांहून अधिक वापरू नये.

- मोबाईलचं नको ते व्यसन लागू शकतं. चिडचिड वाढणं, अस्वस्थता वाढणं हे घडून येऊ शकतं. मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रात सध्या मोबाईल व्यसनी मुलांसाठी ओपीडी सुरू करण्यात आलेली आहे. यात मोठी वाढ होईल.
- सायबर गुन्ह्यांविषयी जाणीव- जागृती वाढवावी लागेल.
- चुकीचे व्हिडिओ बघणं, चुकीची बटणं दाबल्यामुळे बँकेतून पैसे कट होण्यासारखे प्रकार वाढीला लागतील.

शिक्षणासारखी सकारात्मक गोष्ट करायला गेलो आणि डोळे- मेंदू- शारीरिक क्षमता यावर दुष्परिणाम- यासारख्या नकारात्मक गोष्टी ओढवून घेतल्या, असं व्हायला नको.


# पुस्तक परीक्षण

संभाषित

# 'दीडदमडीना' अर्थात खंडित जगण्याचा कोलाज

**नेहा किशोर सावंत**

लेखिका व प्राध्यापक
भवन्स महाविद्यालय, अंधेरी, मुंबई
nehasawant603@gmail. com




(परीक्षित पुस्तक: दीडदमडीना, लेखक: वर्जेश सोलंकी, प्रकाशक: लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती: २०१५, पृष्ठे : १०३, मूल्य: रु. १३०)

*वर्जेश ईश्वरलाल सोलंकीच्या कविता* या आपल्या पहिल्या काव्यसंग्रहानेच नव्वदोत्तर काव्यजगतात आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या, वर्जेश सोलंकी या कवीच्या *ततपप* या दुसऱ्या काव्यसंग्रहानंतर *दीडदमडीना* अशा आगळ्यावेगळ्या शीर्षकाचा आत्मपर लेखांचा संग्रह लोकवाङ्मय गृहातर्फे २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे.

या लेखसंग्रहाचे स्वरूप तसे छोटेखानीच आहे. हे लेखन आत्मपर असले तरी रूढार्थाने आत्मकथन म्हणावे तसे नाही. आत्मपर लेखनात जी सलगता किंवा सुसूत्रता असते तशी यात दिसत नाही. लेखकाच्या जीवनाचे तुकड्या-तुकड्यांत, खंडित वास्तवाचे कोलाज असावे असे या लेखांचे स्वरूप आहे. आरंभ आणि शेवट अशा क्रमाने हे लेख येत नाहीत, किंवा सयकातर करणाऱ्या (स्मरणरंजन -नॉस्टाल्जिया) भावनेतून हे लेख लिहिलेले दिसत नाहीत तर जसे भरकटलेपण जगण्यात आहे तसेच भरकटलेपण लेखांतून व्यक्त झालेले दिसते. किंबहुना विस्कळीत जगण्याचे विस्कळीत चित्र रेखाटण्याचा प्रयत्न वर्जेशने केलेला आहे, म्हणूनच या लेखांची रचनाही सलग म्हणजेच जन्म, बालपण, तारुण्य, गृहस्थजीवन अशा रूढ क्रमाने झालेली दिसत नाही.

एकूण १९ लेखांमधून वर्जेशने गतायुष्यातील आठवणींचा व संघर्षाचा परामर्श आगळ्यावेगळ्या अशा तरुणाईच्या बंबैय्या भाषाशैलीतून घेतला आहे. उगीचच आयुष्याचा फापटपसारा मांडलेला नाही की वाचकांची सहानुभूती मिळवण्यासाठी आयुष्यातील पराकोटीच्या दुःखाचं, धडपडीचं ऊरबडवेपणाने प्रदर्शन केलेलं नाही, तर बालपण ते पौगंडावस्था, तारुण्यातील शारीर जाणीव, शारीर आकर्षणातील संभ्रमावस्था तसेच उमेदीच्या, धडपडीच्या तारुण्यातले मनावर कोरून राहिलेले प्रसंग, नोकरीच्या ठिकाणचे राजकारण, आंतरिक- मानसिक तसेच सामाजिक परिस्थितीशी सुरू असलेला अविरत संघर्ष तसेच आयुष्यात पाहिलेले मृत्यू, मनात घर करून राहिलेल्या व्यक्तिरेखा या घटकांमधून जीवनाचा ठराविक पट अतिशय संवेदनशीलतेने उभा केला आहे. बालपण, पौगंडावस्था, महाविद्यालयीन जीवनातील संभ्रमित अवस्था, भविष्याविषयीची धूसरता, भरकटलेपण, रेल्वे लोकलमधील क्षणिक पण एकमेकांच्या विरंगुळ्याचे विश्व अशा अनुभवांच्या तुकड्यांतून अस्वस्थ आणि विमनस्क तरुणपिढीचेच काहीसे प्रातिनिधिक भावविश्व रेखाटण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

या साऱ्या लेखनाला काहीशी ग्रामीण आणि काही महानगरीय अशी सामाजिक पार्श्वभूमी आहे. देशभरात उसळलेली हिंदू-मुस्लिम दंग्याची, राममंदिर–बाबरी मशिदीच्या घटनेची पार्श्वभूमी, अंडरवर्ल्डचे विशिष्ट वर्तुळातील साम्राज्य, त्याचा दबदबा असे समकालीन संदर्भ निवेदकाच्या कचखाऊ आणि भयग्रस्त, सैरभैर मनःस्थितीला पूरक आणि संवादी ठरलेले दिसतात.

आत्मपर लेखनात सर्वसाधारणपणे प्रथमपुरुषी निवेदनशैलीची योजना केलेली असते. परंतु *दीडदमडीना*मध्ये मात्र तृतीयपुरुषी निवेदनशैली योजलेली आहे. यातील निवेदक (वर्जेश) हा वर्जेश सोलंकीकडे म्हणजेच दीडदमडीनाकडे त्रयस्थाच्या भूमिकेतून पाहतो. वर्जेश सोलंकी हा निवेदकाच्या भूमिकेतून 'मी'कडे म्हणजेच दीडदमडीना'कडे पाहतोय (एक झाड दोन पक्षी, बलुतं यांमधील निवेदनशैली अशाच प्रकारची आहे. ) त्यामुळे अपरिहार्यपणे निवेदनात तटस्थपणा आलेला दिसतो. या लेखसंग्रहाबाबत मनोगत लिहिताना तो म्हणतो, "स्वतःबद्दल लिहायचे म्हणजे स्वतःच स्वतःचे कपडे काढून डान्स करण्यासारखे" (पृ. ५) या विधानातूनच हे लेखन करण्यामागच्या भूमिकेचा प्रामाणिकपणा व निखळपणा व्यक्त होतो. आत्मस्तुती किंवा आत्मप्रौढी यात केलेली नाही, उलट 'दीडदमडीना' या शीर्षकातूनच स्वतःविषयीचे न्यूनत्व,

कचखाऊवृत्ती, परिस्थितिशरणता, स्वतःचे दुबळेपण व्यक्त होते. (जी वर्जेशच्या अनेक कवितांतूनही व्यक्त होताना दिसते.) 'पाण्यात राहून माशाशी वैर न करण्यातच भलाई होती' (पृ. ७७) किंवा 'आयुष्यात न केलेल्या चुकीबद्दल कुणाकडे तरी तो क्षमा मागत होता' (पृ. ६६) यांसारख्या विधानांतून त्याची लाचारी आणि परिस्थितिशरणता अधोरेखित होत जाते.

*दीडदमडीना* या लेखसंग्रहातील लेख कालानुक्रमे आलेले नाहीत तर काहीशा flash back तंत्राने आले आहेत असं म्हणायला हरकत नाही. वर्जेशच्या पहिल्या काव्यसंग्रहाला पुरस्कार मिळाल्याच्या हकिकतीपासून लेखांना सुरुवात होते. या हकिकतीनंतर भूतकाळातील घडलेल्या एकेक घटना, आठवणी, काही व्यक्तिरेखा, नोकरीचे अनुभव स्वतंत्र लेखांमधून एखाद्या कोलाजसारखे तुकड्यातुकड्यांतून उलगडत जातात आणि नापास झालेल्या एका मुलाचे प्रगतीपुस्तकच आपल्या समोर खुले होत जाते. 'पराभव आणि संघर्ष या आपल्या आयुष्याच्या दोन बाजू आहेत' (पृ. ४१) असे 'दीडदमडीना' म्हणतो. त्याचे हे विधान म्हणजेच या लेखसंग्रहाचे मुख्य सूत्र आहे. व्यक्तिगत जीवनाविषयीची (जन्म तारीख,नाव, आडनाव बदलण्याची) हकिकत सांगतानाच त्याच्या व्यक्तिमत्त्वाला चिकटून बसलेली हतबलता, दुर्बलता, परिस्थितिशरणता अधोरेखित होत जाते. कौटुंबिक ओढग्रस्ती, दारिद्र्य या समस्यांबरोबरच त्याला पडणारी भीतिदायक अन् अस्वस्थ करणारी स्वप्नं, बांडगुळासारखं व्यक्तिमत्त्वाला चिकटून राहिलेलं भेदरलेपण, वयपरत्वे होणारे शारीरिक बदल व त्यातून निर्माण होणाऱ्या शारीर जाणिवा, पौगंडावस्थेतील नवतारुण्याच्या नवथर जाणिवा, या वयातील काही गोष्टींची अनभिज्ञता तर काही गोष्टींविषयीची अनावर ओढ याचे दिलखुलास आणि प्रांजळ कथन केले आहे. स्वप्न व वास्तव यांमधील विपरीत ताणही अनेक ठिकाणी व्यक्त झालेला दिसतो. परिस्थितीशी व स्वतःशी चाललेला आंतरिक संघर्ष नेमक्या शब्दात व्यक्त केला आहे.

कौटुंबिक ताणतणाव तसेच आर्थिक ओढग्रस्तीशी सामना करताना आईची होणारी दमछाक पाहून हळहळणारा दीडदमडीना, शिक्षकांना घाबरणारा, परीक्षेला घाबरणारा, टीसीला घाबरणारा दीडदमडीना कोणतेच साहस करू धजावत नाही. नाही म्हणायला वडिलांचा पिढीजात शिवणकामाचा, दर्जीपणाचा धंदा न स्वीकारण्याचे एकच बंड तो करतो. त्याऐवजी घरात कधीही कुणीही न उचललेली लेखणी मनापासून व्यक्त होण्यासाठी उचलतो. मनातला साचलेला कोलाहल व्यक्त करण्यासाठी त्याला एक सृजनशील

साधन सापडतं. अर्थात हे बंद करण्यामागेही स्वतःची असमर्थताच कारणीभूत असल्याचे त्याला जाणवते. एक तर शिक्षण घेतल्याने बऱ्यापैकी नोकरी लागेल, दर महिन्याला नियमित पगार घरी येईल शिवाय घरच्या कुंद आणि तणावाच्या वातावरणातून बाहेर पडता येईल हा सुप्त हेतू आहे. शिवाय दर्जीकामात त्याला रस नाही. याबाबत तो म्हणतो, 'अंगुस्तान नावाच्या विद्यापीठाशी त्याचं काही देणं घेणं नव्हतं. काज व हातशिलाई करून त्याला मानेचा विकार ओढवून घ्यायचा नव्हता. बाबांसारखे कॅनव्हासला इस्त्री मारून लोकांची कॉलर टाईट करायची नव्हती.' (पृ. ११) मुळात या दीडदमडीनाचा स्वभावच काहीसा अंतर्मुख, मितभाषी असल्यामुळे अभिव्यक्त होण्यासाठी कविता हे माध्यम त्याला जवळचे वाटते. हे सारं सहजासहजी घडत नाही, त्यासाठी त्याने केलेला संघर्ष वाचकांच्या मनाला भिडल्याशिवाय राहत नाही. वर्जेशच्या कवितेची निर्मितिप्रक्रिया, त्याच्यावर असलेला मान्यवर कवींचा प्रभाव, काव्यलेखनाच्या उमेदीच्या काळात थोरामोठ्यांकडून मिळालेला नकार याविषयी कडवट भावना न ठेवता सत्यकथन केलेले आहे.

'मृत्यू' हा घटक ठळकपणे या लेखांमधून आलेला दिसतो. मग तो अंगणात लावलेल्या बाटली आंब्याच्या झाडाचा असो की दारूच्या आहारी गेलेल्या वडिलांचा कॅन्सरने झालेला मृत्यू असो, आजी, मामा या कौटुंबिक व्यक्तींचा असो किंवा पप्पू, अय्यर, बाफना या मित्रांचा असो किंवा ट्रेनमधील सहप्रवाशाचा असो, या मृत्यूंच्या वर्णनातून दीडदमडीनाचा हळवा अन् संवेदनशील स्वभाव दिसून येतो. 'काळ' हातातून निसटत चालल्याची कातर जाणीव त्याच्या लेखनातून व्यक्त होते. हे मृत्यूचे दर्शन दीडदमडीनाला (वर्जेशला) जसे अंतर्मुख करते तसेच ते वाचकालाही अस्वस्थ करते. या संग्रहातील काही प्रसंग उदा. उंदराने बूट कुरतडणे, मित्राने दिलेले जुने बूट नव्या आनंदाने घालून जाताना ट्रेनमधून पडणे, बहिणीच्या लग्नासाठी पै-पै जमवणे हे सारेच प्रसंग त्याच्या 'दुष्काळात तेराव्या महिन्याची' अनुभूती देतात. तसेच यातील आई, वडील, मावशी, आजी, पप्पू यांसारख्या व्यक्तिरेखा मनात घर करून बसतात.

या लेखांमधून वसई, विरार- आगाशी परिसराचे प्रादेशिक, सांस्कृतिक पर्यावरण जसे यात टिपले आहे तसेच ख्रिस्ती जीवनाचा प्रभावही अनेक ठिकाणी व्यक्त झालेला दिसतो. याचबरोबर महानगरीय गतिशील जीवनाचे संदर्भही स्वाभाविकपणे अधोरेखित झाले आहेत. रेल्वेतील धावते विश्व व प्रवास यांचेही उत्कट चित्रण केले आहे. महानगरीय जीवन व आगाशी सारख्या

निमशहरी भागात जगताना, दोहोंची सांगड घालतानाची त्रेधा नेमकेपणाने व्यक्त केली आहे. तर दीडदमडीनाचे बालपण, पौगंडावस्था, तारुण्यावस्था या टप्प्यांवरील तुकड्या-तुकड्यांत विखुरलेले जगणे आणि त्या जगण्याचा शोध हेच केंद्रवर्ती असल्यामुळे या आत्मकथनाला मिळालेला ललितबंधाचा किंवा ललितलेखांचा घाट अधिक सयुक्तिक वाटतो. सामाजिक घडामोडी थेटपणे येत नाहीत. त्याच्या जगण्यासारखेच समाजाचेही तुकड्या-तुकड्यांत विखुरलेले, विविध स्तरीय चित्रण येते. उदाहरणार्थ त्याचे बालपण ज्या आगाशी गावात गेले ते गाव; शहर आणि गाव यांच्या सीमारेषेवरचे आहे. तेथील निसर्ग, सोयीसुविधांचा अभाव असलेली शाळा, गावागावांना जोडणारी एस. टी., जुने पुराणे, घुशी उंदरांचे साम्राज्य असलेले पडीक थिएटर, नव्यानेच सुरू झालेली व प्रौढांसाठीचे चित्रपट दाखविणारी व्हीडिओ पार्लर्स, तर दुसरीकडे बऱ्यापैकी समृद्धीचे जीवन जगणारा, शेती व्यवसाय करणारा, विदेशात नोकरी करणारा ख्रिस्ती समाज असे सांस्कृतिक वातावरण दिसते. तर नोकरीला लागल्यानंतर लोकलमध्ये विविध जाती, धर्म, व्यवसाय करणाऱ्या समाजाचे प्रातिनिधिक तुकडे, त्यातून दिसून येणारी त्यांची मनोवृत्ती या साऱ्यांचा दीडदमडीनाच्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम यातून समकालीन समाज-मानसिकता रेखाटण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. उदाहरणार्थ, व्यक्तिगत समस्या दूर करण्यासाठी वेगवेगळया देवदेवतांचे आधार घेणे, कुणा मित्राने माता नागकन्या यांच्या बैठकीला जा असे सुचविणे, सिद्धिविनायकाला जाणे, मावशीने मोतमावलीच्या दर्शनाला नेणे यावरून समाजाची दैववादी आणि देववादी वृत्ती अधोरेखित करताना त्यातील फोलपणा दीडदमडीनाला जाणवतो. अशा काही उल्लेखांतून 'मी' च्या मनातील अस्वस्थता आणि आंतरिक संघर्ष नेमकेपणाने रेखाटला आहे.

या ललित गद्यात 'मी'च्या आयुष्याचे जसे विखुरलेले तुकडे व्यक्त केले आहेत, किंबहुना अनेक तुकड्यांमध्ये जसे 'मी'चे अस्तित्व विखुरलेले आहे तसेच त्याच्या भोवतालचा समाजही तुकड्यातुकड्यांत विखुरलेला दिसतो. लोकलमधील लोकसमूह, बारमधील लोकसमूह, कार्यालयातील माणसे, महाविद्यालयातील लोकसमूह अशा विविध तुकड्यांमध्ये आणि अवकाशात विखुरलेला आहे. यादृष्टीने पाहता या लेखनात अनेक आवाज मिसळलेले दिसतात. लोकल ट्रेनमधील अनुभवातून, लोकांच्या चर्चेतून वेगवेगळ्या स्तरांतील मानसिकता चितारण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. उदाहरणार्थ ट्रेनमधील हिंदुत्ववादी गटाकडून राममंदिर होण्यासंबंधीच्या

घोषणा, तर व्यावसायिकांच्या शेअर मार्केटच्या चर्चा, तरुणांच्या बीयर बारमधील बारबालांचे अनुभव, लैंगिक संबंधांविषयीच्या चीरपापलेट, नल फिट करना, रातका छायागीत, नल्ली साफ करना अशा सांकेतिक भाषेतील चर्चा हेच या लोकांच्या दृष्टीने ऐरणीवरचे प्रश्न दिसतात. अशा वातावरणात होणारी दीडदमडीनाची घुसमट आणि प्राप्त परिस्थितीला नकार देण्याची हिंमत नसल्याने मुकाट्याने शरण जाण्याची दुबळी वृत्ती ठळकपणे अधोरेखित होते. ‘कवीबिवी म्हणजे शुद्ध वेडसरपणा. स्वतःची वाढलेली काढूही शकत नाही व दुसऱ्याच्या झिंज्या उपटूही शकत नाही एवढे परिस्थितिशरण’ (पृ.१०१) अशा विधानातून हे अगतिकपण व्यक्त झालेले दिसते.

पौगंडावस्थेतील शारीरिक बदल, हस्तमैथुनाचे त्याच्या पप्पू या मित्राने सांगितलेले अनुभव, दीडदमडीनाला आलेले समलिंगी आकर्षणाचे अनुभव त्यातून त्याने केलेलं चिंतन हे ‘मारून मुटकून शरीराला त्या हिणकस गोष्टीसाठी तयार करणं त्याला अपराधीपणाचं वाटू लागलं’ (पृ. ३३) या विधानातून व्यक्त होतं. पूर्वापार संस्कारांमुळे असे अनुभव तो पाप संकल्पनेत बसवतो. यावरून त्याचा भाबडेपणा आणि त्याच्या मनावरील पूर्वसंस्कार अधोरेखित होतो. तर दुसरीकडे त्याचे लग्न झाल्यावर आयुष्यात आलेली पहिली स्त्री पाहिल्यावर ‘स्त्री म्हणजे शरिरापलीकडची गोष्ट असते हे त्याला पहिल्यांदाच जाणवलं. एकदम आपल्यासारखीच मांसमज्जातंतुबरगड्या आदी धाग्यांनी विणलेली, अद्भुत व वेगळी ‘ (पृ. ८४) यासारख्या विधानातून त्याचा तरल संवेदनशील स्वभावही दिसून येतो तसेच स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याचा दृष्टिकोणही व्यक्त होतो. समलिंगी अनुभव, अशा जाणिवा यांविषयी प्रांजळपणे केलेले निवेदन तसेच नोकरीच्या ठिकाणचे राजकारण, फसवेगिरी, लाचलुचपत असे काही वेगळे अनुभव हे या लेखांचे वेगळेपण नोंदवता येईल.

या लेखांमध्ये कोणतीही विशिष्ट सामाजिक भूमिका मात्र घेतलेली दिसत नाही, कारण तो या लेखनाचा हेतूच नाही. या लेखांमध्ये व्यक्त झालेला जीवनप्रवास हा बालपण, पौगंडावस्था व तारुण्यावस्था अशा टप्प्यावरील आत्मशोधाचा आहे. हा आत्मशोधच मुख्य प्रतलावर आलेला असल्याने तसेच कोणतीही सामाजिक भूमिका घेण्याइतपत परिपक्वता आणि आत्मविश्वास दीडदमडीना या निवेदकामध्ये नसल्याने त्याची सामाजिक भूमिका येथे व्यक्त झालेली दिसत नाही.

या लेखसंग्रहाची भाषाशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. हिंदी, गुजराथी व मराठी भाषेची योजना यात केलेली आहे. वर्जेश मूळचा गुजराथी भाषिक असल्यामुळे

काही ठिकाणी ती अपरिहार्यपणे योजली आहे. शाळकरीविश्व, कॉलेजविश्व, रेल्वेतील वैविध्यपूर्ण विश्व साकारताना बम्बैय्या टपोरी भाषेचा (काहीशी द्व्यर्थी व लिंगसूचक स्वरुपाची) वापर केला आहे. आपल्या मनातील उद्विग्नता व त्रागा 'चुतीया', घाम गोट्यांपर्यंत जाणे, गांडमारी धंदे, गांड डळमळीत, गांड लागणे, गांडीची सालटी निघणे यासारख्या लिंगसूचक शब्दांतून व्यक्त केला आहे. तसेच काही ठिकाणी 'येडूगांडू', 'घाबरीगांड', 'तितरबितर', 'गौतम गंभीर' अशा शब्दांतून स्वतःविषयीचे दुबळेपण व्यक्त केले आहे. अशा तऱ्हेची कसलाही आडपडदा न ठेवता योजलेली भाषाशैली या लेखसंग्रहाला वेगळेपणा देते. 'काळजी – कलेजी' गौतम – गोविंदा, गौतम – गंभीर यासारख्या शब्दांची वेगळयाच अर्थाने केलेली योजना निवेदनाला नक्कीच ताजेपणा देते. तर रापचीक, टस्सन, फटीचर, रफादफा, आयटम, झाटमिंगेल, छाकटे, करुपांडू अशासारखी शब्दयोजना तरुणपिढीच्या मानसिकतेचा प्रत्यय देणारी आहे हे या लेखसंग्रहाचे वैशिष्ट्य आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. या संग्रहातील निवेदनशैलीवर, भाषाशैलीवर वर्जेशच्या कवितेचा ठसा काही अंशी जाणवतो.

उदा. 'किशनघवालाजोशीजगतापअय्यंगार' अशा रचनेतून त्याला जाणवलेले वैयर्थ प्रभावीपणे व जोरकसपणे नोंदवले आहे.

माझी कविता हेच माझे आत्मचरित्र असे म्हणणाऱ्या वर्जेशचा *दीडदमडीना* हा लेखसंग्रह वाचतानाही आपण वर्जेशच्या कविताच वाचत असल्याचा प्रत्यय येतो.

उदाहरणार्थ - आपल्या घरातील ओढग्रस्त स्थिती आणि आईचे कष्ट पाहून तो म्हणतो, 'आई स्टोव्ह पुढ्यात भणभणत होती, कितीतरी वर्ष ती अशीच भणभणतेय.' (पृ. ५०) किंवा 'घराच्या छतावर नजर फिरवली, काजळीने कौलं काळीकाळी पडली होती. कौलं त्याला समकालीन वाटू लागलेली' (पृ. ५०). इतकी तरल व संवेदनशील भाषाशैली हे या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अतिशय छोटी-छोटी वाक्यरचना हेही या लेखांचे वैशिष्ट्य आहे. अशा छोट्या-छोट्या वाक्यरचनेमुळे निवेदनाला लयबद्धता प्राप्त झालेली दिसते. त्यामुळे अनेक ठिकाणी वर्जेशची कविताच वाचत असल्याचा प्रत्यय येतो. सुरुवातीच्या काळातील वर्जेशच्या दुबळया व्यक्तिमत्त्वाशी संवादी असणारे शीर्षक, नंतरच्या काळातील कवी म्हणून प्रसिद्ध झालेल्या, घराच्या व स्वतःच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या वर्जेशच्या व्यक्तिमत्त्वाशी विसंगत वाटू लागते. स्वतःकडे कायमच न्यूनत्व घेऊन एकीकडे स्वतःचा दुबळेपणा व्यक्त

करणे तर दुसरीकडे वडिलांच्या, आजीच्या, पप्पू या मित्राच्या, आंब्याच्या झाडाच्या मृत्यूने विचलित होणे, त्यावेळचे त्याने केलेले चिंतन त्याच्या संवेदनशीलतेचा प्रत्यय देणारे आहे.


या लेखांमधून अभिव्यक्त होणाऱ्या दीडदमडीनाच्या आंतरिक संघर्षामुळे, त्याच्या परिस्थितिशरण वृत्तीमुळे आणि आत्मविश्वासरहित जगण्याच्या विपरीत ताणामुळेच 'दीडदमडीना' हे शीर्षक अधिक परिणामकारक व अर्थपूर्ण वाटू लागते. या लेखसंग्रहाचे मुखपृष्ठही उल्लेखनीय असे आहे. या मुखपृष्ठात एका पत्र्याच्या दाराच्या दोन झडपा दाखवल्या आहेत. एक झडप गंजलेली, हलाखीच्या अवस्थेतील तर दुसरी झडप डागडुजी केलेली, त्यातल्या त्यात रंगरंगोटी केलेली आहे. असे हे मुखपृष्ठ दीडदमडीनाच्या आयुष्यातील पडझड व प्रगतीला सुचवणारे आहे. त्याद्वारे प्रारंभीची ओढग्रस्तता, विपन्नावस्था व पुढील काळातील आर्थिक स्थिरता व्यक्त होते. तसेच अंतर्मुखतेकडून बहिर्मुखतेकडे, अपयशाकडून यशाकडे घडत गेलेल्या प्रवासालाही व्यक्त करते त्यामुळे अशा सकारात्मक बदलाची स्थिती व्यक्त करणारे, लेखाच्या आशयाशी व शीर्षकाशी संवादी असणारे नितीन दादरावाला यांचे मुखपृष्ठ उल्लेखनीय आहे. एका बैठकीत हे पुस्तक वाचून होते. पुस्तक वाचल्यानंतर एकप्रकारची अस्वस्थता मनात दाटून येते. या पुस्तकातील शेवटचा लेख हा वडिलांच्या मृत्यूची हकिकत सांगणारा आहे, हा लेख वाचल्यावर लेखकाला आणखी काहीतरी सांगायचे, सुचवायचे आहे का? असे वाटत राहते. त्याचप्रमाणे आणखी काही आठवणींचे, अनुभवांचे लेख हवे होते ही अतृप्तीची जाणीव वाचकाच्या मनात निर्माण होते. एकंदरीत आत्मकथनपर साहित्यामध्ये 'दीडदमडीना'च्या निमित्ताने आपला वेगळा ठसा उमटविण्यात वर्जेश सोलंकी निश्चितच यशस्वी झालेले दिसतात, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

संभाषित

# कलेपासून कलेकडे : कलाचिंतनाचा प्रवास

**मारूती शेळके**

चित्रकार व प्राध्यापक
सर जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्स, मुंबई
shelkemaruti@gmail.com




(परीक्षित पुस्तक: कलेपासून कलेकडे, लेखक: प्रभाकर कोलते, प्रकाशक: बोधना प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती: २००८, पृष्ठे: १७२, मूल्य: रु. ४९५)

भारतीय कलाक्षेत्रातील अमूर्तवादी शैलीचे सुप्रसिद्ध चित्रकार म्हणून प्रभाकर कोलते परिचित आहेत.  त्यासोबतच ते एक विचारवंत लेखक, उत्तम शिक्षक, मूलभूत भारतीयत्वाचे गाढे अभ्यासक, समर्पित चिंतक आणि विश्लेषक आहेत. त्यांच्या या प्रतिभासंपन्न आणि बहुआयामी व्यक्तित्वाचा प्रत्यय २००८ साली बोधना प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या *कलेपासून कलेकडे* या ग्रंथातूनही येतो. एकाचवेळी मराठी व इंग्रजी *(आर्ट टू आर्ट)* या दोन्ही भाषांतून *प्रकाशित झालेल्या* त्यांच्या या ग्रंथाला  'दुर्गा भागवत शब्द पुरस्कार'ही प्राप्त झाला आहे.भारतीयत्वाचे अमूर्ततेशी असणारे नाते उलगडवून सांगणे, कलेतील अमूर्ततेकडे पाहण्याची दृष्टी देणे यासोबतच 'आपल्याला चित्रकलेतले काही कळत नाही,' असे म्हणणाऱ्यांना त्यातले मर्म सांगणे आणि चित्रकलासन्मुख बनवणे असे कार्यही या पुस्तकाच्या वाचनाद्वारे घडून येते. त्यादृष्टीने हे पुस्तक सहज, सोपे आणि मार्मिक आहे. असे असले तरी विश्लेषण केल्याशिवाय किंवा अभ्यास केल्याशिवाय कोलतेसरांनी चित्रांमध्ये योजलेले रंग जसे ओळखू येत नाहीत त्याचप्रमाणे त्यांच्या लिखाणाचे काही रंगदेखील वाचून चिंतन केल्याशिवाय उलगडत नाहीत.

काही लोकांच्या मते, चित्रकला ही वाईट कला आहे, माणूस त्यात वाहत जातो व काठावर येण्याचे विसरतो. पण चांगला शिक्षक असल्याने कलासमुद्रात आकंठ डुंबत असतानाही कोलतेसरांची नजर सतत काठावर स्थिर असल्याची जाणीव त्यांचे भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित लिखाण वाचताना होत राहते.



सामान्यतः चित्राला द्विमिती असतात आणि तिसऱ्या मितीसाठी चित्रकार प्रयत्नरत असतो पण सपाट रंगलेपणातून ब्रशचे फटकारे,पारदर्शक- अपारदर्शक आच्छादन, ओघळ किंवा दोन फटकाऱ्यांमधील गॅपमधून इप्सित तिसरी मिती सहज साध्य करून चित्रात जीव ओतणे हे कोलतेसरांच्या चित्रांत पाहायला मिळते. हीच गूढता व नाट्यमयता त्यांच्या लिखाणातही डोकावताना दिसून येते आणि तशीच क्रमाक्रमाने स्पष्टही होत जाते.


भारतीय चित्रकलेचा इतिहास पाहता 'प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुप'नंतर शब्दांचा वापर करून व्यक्त होणाऱ्या चित्रकारांची फार कमी नावं समोर येतात. मात्र प्रभाकर कोलते बोलतात. सामान्यांच्या भाषेत बोलतात. त्यांच्या या पुस्तकातील चौदा लेखांमधून कलेबद्दल, कलाकारांबद्दल, कलाशिक्षणाबद्दल ते बोलतातच पण संस्कृती, अध्यात्म, कलाक्षेत्रातील अतिक्रमण, समाजरचना, समाजाची मानसिकता, समाजातील घातकपद्धती, कलाक्षेत्राचा ऱ्हास, कलादालन संस्कृती, चित्रकाराचे मन, चित्रकाराचा आशय- विषय अशा विविध विषयांवरही भाष्य करून वाचकांना विचार करायला प्रवृत्त करतात. या पुस्तकातील प्रत्येक लेख हा स्वतंत्र भाष्य करणारा आणि तरीही 'कलाचिंतना'च्या समान सूत्राने एकमेकांशी गुंफलेला आहे. पुस्तकाला रत्नाकर मतकरींसारख्या मातब्बर लेखकाची प्रस्तावना लाभलेली असून त्यांनी कोलतेंची लेखनशैली ही लयबद्ध वाक्यरचनेची, शब्दांचे विविध प्रयोग करणारी व नाट्यपूर्ण असल्याचे म्हटले आहे.( **पृ. १८)** कलावंत आणि

रसिक यांच्यात नव्याने संवाद सुरू व्हायला *कलेपासून कलेकडे* हा लेखसंग्रह कारणीभूत ठरेल, असेही त्यांचे ठाम होते आणि ते मत समर्पक असल्याचे वाचताना जाणवत राहते.

पुस्तकातील लेखांचे ढोबळमानाने तीन भाग करता येतील. पहिला 'संस्कृती आणि कला' याविषयीचा आहे. दुसरा समकालीन चित्रकारांविषयी चर्चा करणारा आणि तिसरा कोलतेंच्या स्वतःच्या कलाकृती आणि निर्मितिप्रक्रियेविषयी उलगडा करणारा आहे.

'संस्कृती आणि कला' - भाग एक आणि दोनमध्ये संस्कृतीविषयी बोलताना कोलते कलेच्या स्वरूपातील सांस्कृतिक मूल्ये हरवत गेल्याचा दुष्परिणाम कलेवर कसा झाला याची चर्चा करतात. पारतंत्र्यात आणि त्यानंतरच्या स्वातंत्र्यातही उत्तरोत्तर कलेची अधोगती होत गेल्याचे निरीक्षण मांडून त्याच्या कारणांचे विवेचन करतात.

प्रभाकर कोलते यांच्यामते,पारतंत्र्यात कलेतील भारतीयत्व कमी झाले. ब्रिटिशांनी त्यांची संस्कृती विकसित करण्यासाठी लाहोर, कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथे कलाशिक्षण देणाऱ्या कलाशाळा उघडल्या. आपले सांस्कृतिक वारसदार तयार करण्यासाठी शैक्षणिक माध्यमांचा आधार घेत या कलाशाळांची निर्मिती केली परिणामी वास्तववादी हुबेहूब चित्रण करण्याची पाश्चात्त्य परंपरा त्यांनी येथे सुरू केली. या प्रकारामुळे भारतीय चित्रशैलीच्या विशेषांचे झालेले नुकसान नोंदवताना ते म्हणतात, 'मुळात एकूणच पाश्चिमात्य चित्रसंस्कृतीमध्ये ब्रिटीश चित्रकलेचे योगदान फ्रान्सिस बेकन या अलीकडच्या चित्रकाराचा उदय होईपर्यंत तरी नगण्यच होते. आपण मात्र त्या चित्रकलेचा भ्रष्ट अनुनय करून भारतीय चित्रकलेचा पाया रचला, असे म्हणण्यापेक्षा उखडला असे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरावे.'(पृ. ३७) एवढी बोचरी





प्रभाकर कोलते – Untitled, जलरंग, २० x ३० in, १९८७

टीका कोलतेंनी कलाशिक्षण पद्धतीवर केली आहे.साठच्या दशकात मुंबईत चित्रकलेच्या क्षेत्रात व्यापारी हस्तक्षेपामुळे भारतीय कलेतील स्वायत्त विचार आणि वैशिष्ट्यपूर्ण अस्मिता जपणाऱ्या विचारवंतांचे खच्चीकरण होत गेले. कलाकृतींचा लिलाव करण्याच्या पाश्चात्त्य पद्धतीमुळे चित्रकारांमध्ये स्पर्धा वाढत गेली. त्यामुळे अलीकडे सदबीज (sothebys) आणि ख्रिस्टीज (christies) या कलाविषयक व्यापारी हेतू असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थांचे महत्त्व वाढले. आंतरराष्ट्रीय दर्जाची क्षमता असणार्या भारतीय कलावंतांनीही पाश्चात्त्य कलावंतांचा अनुनय करण्यास प्रारंभ केला. चित्रकलेकडे सांस्कृतिक जबाबदारीच्या जाणिवेपेक्षा एक सुरक्षित व्यवसाय म्हणून किंवा केवळ पोट



प्रभाकर कोलते – Untitled, जलरंग, ८ x ८ in, १९८७

भरण्याचा तांत्रिक मार्ग म्हणून पाहिले. कलाशाळा विद्यार्थ्यांनी भरभरून वाहू लागल्या पण समर्पित कलाशिक्षक राहिले नाहीत. साहजिकच सांस्कृतिक औद्योगिकरण होऊ लागले. दिल्ली, कलकत्ता, मद्रास या राजधानीसदृश शहरांमध्ये चित्रकलेला पोषक वातावरण निर्माण होऊनही, आर्थिकदृष्ट्या बळकट झालेली चित्रकला संकल्पनेच्या पातळीवर दुर्बलच राहिली.

त्यातच आपले स्थान अबाधित राखत सर्वच छान म्हणणाऱ्या कलासमीक्षकांच्या गर्दीत कठोर व सच्चा समीक्षकाचा अभाव असल्याने कलाशिक्षण संस्था ते आंतरराष्ट्रीय स्थान अशी एक अदृश्य मतलबी साखळी तयार झाल्याचे वास्तव कोलते अधोरेखित करतात. परिणामी सर्व सीमांवर सर्व आलबेल असल्याचा गाढ गैरसमज असल्याची मार्मिक टीकाही करताना दिसतात.



...कर कोलते – Untitled, जलरंग, २२ x २० in, १९९०


कोलते यांच्यामते कलावंताने कलेद्वारे मूल्यविचार रुजवणे, समाज अभिरूचिसंपन्न बनवणे ही कलावंतांची जबाबदारी आहे. कलेने जीवनाला विस्तारत नेले पाहिजे पण आज जीवनाच्या सर्व क्षेत्रांमधून कला व मूल्ये हद्दपार झाल्याने जीवनाला भ्रष्टता आणि कुरूपता आली आहे.पर्यायाने समाज प्रगत होण्यापेक्षा केवळ धनवान झाला आहे. वास्तविक विद्यार्थी, शिक्षक,

कलावंत, समीक्षक आणि रसिक या पाच अंगरक्षकांनी एकमेकांवर दडपण न आणता एकमेकांवर कुरघोडी न करता, कलेचे संगोपन करायला हवे, असे चिंतनही या लेखांमधून प्रकर्षाने व्यक्त होत राहते.

कलेच्या अधोगतीच्या कारणांविषयीचे हे विश्लेषण करतानाच कोलते यांनी भारतीय कला परंपरेला असणारा अमूर्ततेचा व्यापक संदर्भ निखळत जाण्याविषयीची खंत व्यक्त केली आहे. साठीच्या दशकातील हुसेन, सुझा, रझा, आरा, गायतोंडे, गाडे, पळशीकर हे सर्वच चित्रकार प्रागतिक होते. त्यांच्या कलाविषयक प्रयोगातूनच भारतीय अमूर्तवादी चित्रकला विकसत गेली. मात्र अमूर्त कला समजत नसल्याची तक्रार सर्वसामान्यांमधून होऊ लागली. असे का घडले याची कारणमीमांसा करताना भारतीय लोकसंस्कृतीने जो समतोल सांभाळला तसा तो नागर कलासंस्कृतीने सांभाळला नाही, याकडे कोलते लक्ष वेधतात. त्यांच्या मते भारतीयांना आध्यात्मिक ओढ व गूढतेचे कुतूहल आहे. जे निसर्गात दिसतात त्या आणि तेवढ्याच ओळखीच्या आकारांच्या पलिकडे जे आकार आहेत, त्यांच्याशी सांधेजोड करीत लोकसंस्कृतीने,



प्रभाकर कोलते – Untitled , तैलरंग, ६० x ४२ in १९९३



प्रभाकर कोलते – Untitled, जलरंग, ३० x ४० in १९९६

भारतीय चित्रकला क्षेत्राने मूर्त आणि अमूर्त यांची सांगड घातली. पण नागर कलासंस्कृतीने अमूर्त आणि मूर्त यांच्यात दरी निर्माण केली. पर्यायाने अमूर्त कला समजत नाही अशी तक्रार निर्माण झाली. भारतीय चित्रसंस्कृतीचा आणखी एक विशेष म्हणजे चित्रकार प्रगल्भ होताना विरक्तही होत जातो आणि अनेक गोष्टींप्रमाणे यथार्थवादाचाही त्याग करत जातो पण कोलते यांच्यामते तशी प्रक्रिया आता प्रत्ययास येत नाही.

दुसऱ्या विभागातील लेखांमधून कोलतेसरांनी अनेक चित्रकारांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडून दाखवले आहेत. आपले समकालीन चित्रकार आणि गुरू असणारे शंकर पळशीकर यांच्याविषयी बोलताना ते रमून जातात. एक चित्रकार आणि आदर्श कलाशिक्षक म्हणून आपल्या या गुरूची प्रतिमा सहजतेने वाचकमनात ठसेल अशी मांडणी करतात.

'हुसेन आणि गायतोंडे - दोन ध्रुव' या लेखात हुसेन आणि गायतोंडे या दोन्ही ज्येष्ठ चित्रकारांची शैली, अप्रोच आणि भूमिका स्पष्ट करत दोघांच्या विचारातील आणि जडणघडणीतील वेगळेपण तसेच स्वतंत्रपणा कारणमीमांसेसह स्पष्ट करण्यात ते यशस्वी ठरले आहेत. दोघांची काही चित्रेसुद्धा संदर्भादाखल छापून या लेखाला पूर्णत्व देण्यात आले आहे. तसेच 'बरवे' प्रतिबिंब या लेखात प्रभाकर बरवे यांच्याही काही चित्रांची समर्पक उकल केलेली पाहायला मिळते. त्यायोगे कलेतील मूलभूत तत्त्वांची चित्रातील महती उदाहरणांसह स्पष्ट केली आहे. 'कोरा कॅनव्हास - एक आनंददायी

सृजनयात्रा' या लेखातून प्रभाकर बरवेलिखित *कोरा कॅनव्हास* या काहीशा दुर्बोध ग्रंथाचे आणि बरवे यांच्या चित्रविषयक जाणिवांचे अतिशय सोप्या शब्दांत विवेचन केले आहे.

'चित्रकलेचा सेंट फ्रान्सिस' या लेखात जातिवंत कलावंत कलानिर्मिती करीत नसतो, तो केवळ स्वतःसाठीच काम करत असतो. या उक्तीवर खऱ्या ठरणाऱ्या सेंट फ्रान्सिस सूझा या 'प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुप'मधील अजून एका महत्त्वाच्या कलाकाराची जडणघडण कोलते उलगडून दाखवतात. सूझाच्या चित्रांविषयी ते म्हणतात 'त्याच्या चित्रांतून प्रतिबिंबित होणारी कठोर समीक्षा - बुद्धी, सौंदर्यशास्त्राचे निर्वस्त्र व्याकरण आणि उत्स्फूर्त चित्राभिनय यांचे मिश्रकाव्य म्हणजे त्याच्या अनुपस्थितीतही काळजाला भिडणारी त्याची चिरंजीवी उपस्थितीच म्हणायला हवी,'(पृ. १२१) कोलतेसरांनी या शब्दांत केलेला शेवट लेखाची गहनता पुरेशी स्पष्ट करणारा आहे.

'स-बंध रेषा' आणि 'जटायू' या दोन लेखांमध्ये मनजीत बावांच्या अत्यल्पवादी शैलीला व भव्यरूप देण्याच्या प्रतिभेला उलगडून दाखवले आहे आणि त्यांच्या चित्रांतील त्यांची दृश्य-अदृश्यपणे प्रश्नप्रवास घडवण्याची किमयादेखील  स्पष्ट करून दाखवली आहे.

'मागे वळून शाळा आठवताना...' या लेखात कोलते यांनी स्वतःच्या बालपणाची व त्यासोबत समाजव्यवस्था आणि शिक्षणव्यवस्था यांची समीक्षा केली आहे. जी खरं तर शिक्षणाच्या उद्दिष्टांची समीक्षा वाटावी एवढी अभ्यासपूर्ण आहे. शिक्षणक्षेत्रातील प्रत्येकाने ती एकदा वाचायलाच हवी एवढ्या मोलाची आहे. 'नीतिमत्तेच्या पुलाखालून...' या लेखात नीतिमत्ता म्हणजे मनःसामर्थ्य असे म्हणत स्वतःच्या जडणघडणीतील खरे निखारे प्रज्वलित करून दाखवलेले आहेत. कोलतेंच्या जडणघडणीचा अभ्यास करणाऱ्या कलावंत आणि अभ्यासकांसाठी हे लेखन महत्त्वाची भूमिका निभावणार आहे. 'माझी चित्रनिर्मिती' आणि 'माझ्यातला कलावंत पाहताना' त्यांच्यातील चित्रकार आणि स्वतः प्रभाकर कोलते या दोघांच्या नात्यातील अन्वय लावण्याचा एक प्रगल्भ प्रयत्न त्यांनी केलेला आहे. तो वाचकांनी स्वतः वाचूनच समजून घ्यायला हवा, असे वाटते. अशाप्रकारे *कलेपासून कलेकडे* हा एक लांब पल्ल्याचा चिंतनप्रवास आहे. आपल्या भोवतालच्या वास्तवाचा आणि त्यापलीकडील नियमांचा सतत शोध घेणारे मन त्यामधून प्रत्ययास येते. कोलतेसरांनी मांडलेल्या निसर्गाच्या अंतर्बाह्य रचनेविषयीच्या व त्यासंदर्भातील गूढाविषयीच्या चिंतनातूनही ते जाणवत

राहते. ते म्हणतात,'सर्वसाधारणपणे ज्याला निसर्ग संबोधले जाते ते तर त्या निसर्गाचे बाह्यरूप असते- सतत बदलणारे - परंतु त्यांचे क्रियाशील अंतःस्थ रूप मात्र कधीच दृष्टीला पडत नाही. स्वतःच्या सृजनाची ओळख - चिन्हे आपल्या बाह्यरूपावर ठेवून ते पसार होत असते. त्याच्या ह्या गूढ स्वभावानेच मला सतत भुरळ घातली आहे. त्याला पूर्णपणे अनुभवण्याची ओढ लागली आहे. असा हा गोचर आणि अगोचर निसर्ग, मला निसर्ग म्हणून अभिप्रेत आहे,' (पृ.१६०) कोलतेसरांनी असा हा निसर्ग केवळ 'मी'पणाच्या लोपातच गवसणे शक्य होईल, ही जाणीव आपल्या कवितेतूनही मांडली आहे-

*मी करतोय*
*पाठलाग त्याचा:*
*सुरू होते तिथेच तो परततो.*
*सुरूच असते सतत*
*त्याचे असे परतणे*
*इथे - तिथे - सर्वत्र.*
*वाटतं, भेटू शकेन*
*मी त्याला*
*जमलेच जर सोडून जाणे*
*माझे मलाच... (पृ. १६१)*

कोलतेसरांच्या चित्रांप्रमाणेच त्यांचे हे लेखनही कलेद्वारे मूर्ताकडून अमूर्ताकडे करावयाच्या प्रवासाचे सूचन करते.

भारताला कलेचा पूर्वापार वारसा लाभलेला आहे. भीमबेटका, अजंठा, वेरूळ, खजुराहो, हंपी बदामी, कोणार्क, असंख्य गडकिल्ले, लेणी गुहाचित्र त्याची साक्ष देतात. मात्र त्याकाळी कलाकार प्रसिद्धिपराङ्मुख होता आणि आजही प्रसिद्धीच्या मागे धावूनही कलाकार प्रसिद्धिपराङ्मुख राहिलाय. त्यामुळे कलाक्षेत्राला दर्शनी चेहरा उपलब्ध होत नाही. एक कलावंत लिहिता झाल्यास हे तर बदलेलच, पण कोलतेसरांसारख्या कलेचं आणि कलावंतांचं मर्म उलगडून दाखवण्याचं सामर्थ्य असलेल्या लेखकांनी लिहितं झाल्यास त्याचा फायदा सर्व समाजाला होईल. कला समजून घ्यायला आणि नवोदितांच्या अंतर्मनातील कलाअंकुर पुनरुज्जिवीत व्हायला त्याची नक्की मदत होईल. यादृष्टीने कोलतेसरांचा *कलेपासून कलेकडे* हा चिंतनग्रंथ मूल्ययुक्त असून मराठीत अत्यल्प असणार्या चित्रकलाविषयक अभ्यासपूर्ण लेखनाची उणीव काही अंशी तरी निश्चित भरून काढतो, असे ठामपणे म्हणता येते.


# सीकींग बेगमपुरा: स्वप्नलोकाचे होकायंत्र

**राही श्रुती गणेश**

लेखक व संशोधक

rahee.ananya@gmail.com

संभाषित




(परीक्षित पुस्तक: सीकींग बेगमपुराः द सोशल व्हिजन ऑफ ऍण्टीकास्ट इण्टेलेक्चुअल्स, लेखक: गेल ओम्वेट, प्रकाशक : नवयान प्रकाशन, दिल्ली, २०१९ (प्रथम आवृत्ती : २००८), पृष्ठे: ३०४, मूल्य: रु. ३९९)

सत्योत्तर जग हे दुःस्वप्नलोकाचं (Dystopic) जग आहे. नव्या सहस्त्रकाच्या दुस-या दशकाअखेर नवउदारमतवादी जागतिक बाजार व्यवस्थेमुळे जगभरात वर्गांची रचना अधिक जटिल झाली आहे. जागतिकीकरणातून उदयाला आलेल्या लोकशाहीकरणाच्या सुरुवातीच्या लाटेतून आधुनिक मूल्यांवर हल्ला होऊ लागला. अगदी लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांवरही आक्रमण झाले. श्रीमंत आणि गरीब जगामधली दरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे आणि त्यातून एक अस्थिर उत्पन्न असलेला नवा युवा वर्ग उदयाला आला आहे. गाय स्टॅण्डिंग (२०११) यांनी या वर्गाला 'प्रिकॅरिएट' असे संबोधले आहे आणि याबाबत सविस्तर सिद्धांतन केले आहे. समकालीन अर्थव्यवस्थेमुळे जगभरातल्या लाखो युवांच्या मनात 'अस्तित्वविषयक असुरक्षितता' निर्माण झाली आहे. त्यांना आपल्या नोकऱ्या गमावण्याची भीती निर्माण झाली आहे. आत्यंतिक गरिबीत, हलाखीत जगणं कंठणारा 'लुम्पेन' वर्ग वेगळाच. 'प्रिकॅरिएट' हा जगण्याबाबतच्या असुरक्षित

आणि अस्थिर अवस्थेतून जन्माला आलेला नवा वर्ग आहे. स्टॅण्डिंग यांचा असा युक्तिवाद आहे की, सुसंघटित नसणारे, आपल्या मागण्या पद्धतशीररित्या मांडू न शकणारे हे लोक म्हणजे इतिहासातला असा पहिला वर्ग आहे. ज्यांचे ठळक हक्क (great rights) व्यवस्थात्मकरित्या नाकारले गेले आहेत. जागतिक राजकीय अर्थव्यवस्थेत विवेकी विचारी पद्धतीने आपली भूमिका निर्धारित करण्यासाठीची भौतिक क्षमता या वर्गाने गमावली आहे. असे असले तरीही स्टॅन्डिंग 'प्रिकॅरिएट' वर्गातील ज्या समूहाचा उल्लेख 'प्रोग्रेसिव्हज' असा करतात, तो समूह समकालीन आर्थिक व्यवस्थेचे बृहत प्रारूप लक्षात घेत, आधुनिक समताधिष्ठित मूल्यांचं जतन करतो. एका नव्या प्रागतिक समाजासाठी हा समूह झटतो आहे मात्र त्याच्याकडे भौतिक आणि वैचारिक साधनांचा अभाव आहे.

दरम्यान उत्तरआधुनिकतेतून अगणित व्यामिश्र आणि वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन निर्माण झाले आहेत. सत्योत्तर जगाने तथ्यांचे आणि तर्काचे महत्त्व कमी करत प्रचारकी, भावनिक कथनाचा आधार घेत सार्वत्रिक मूल्य-विचारांना नकार दिला आहे. या विखंडित संस्कृतीच्या कोलाहलात संकुचित राष्ट्राभिमानी नवफॅसिस्ट पुराणमतवाद्यांचा जागतिक नेते म्हणून उदय झाला आहे. भल्या जगासाठीची व्यापक आस्था आणि त्यासाठीचे प्रयत्न हे सारेच या कोलाहलात विरून चालले आहे. याउलट अस्तित्वविषयक भीती मिळून अनुभवताना नवनव्या दुःस्वप्नांच्या प्रतिमाच दिवसेंदिवस जन्म घेत आहेत.

या साऱ्या संदर्भांच्या पार्श्वभूमीवर *सीकींग बेगमपुरा* या पुस्तकाचे औचित्यमूल्य अधिक आहे. भारतात नवउदारमतवाद स्थिर होत असताना हे पुस्तक सुमारे दशकभरापूर्वी प्रसिद्ध झाले. तेव्हापेक्षाही कदाचित आज या पुस्तकाचे संदर्भमूल्य अधिक आहे. गंभीर चिंतनात्मक अकादमिक लेखन म्हणून आणि प्रागतिक सामाजिक परिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीचा जाहीरनामा म्हणून, अशा दोन्ही अर्थांनी हे पुस्तक महत्त्वाचे आहे. भारतीय जात-विरोधी विचार परंपरांचा मागोवा घेत समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठीचा मार्ग ओम्वेट या पुस्तकात दाखवतात.

*सीकींग बेगमपुरा* ही स्वप्नलोकाची शोधयात्रा आहे. ओम्वेट स्वप्नलोकाची व्याख्या प्रामुख्याने विवेक आणि आनंदातिशय या संदर्भाने करतात. स्वप्नलोक या दोन बाबींमधून आकाराला येतो. समता आणि प्रेम यावर आधारलेल्या समाजाविषयीची उत्कट भावना आणि आशा हा त्यातला पहिला महत्त्वाचा घटक आहे (आनंदातिशय). दुसरा घटक आहे तो अशा

प्रकारचा समाज अस्तित्वात येण्यासाठीच्या सूत्रबद्ध तार्किक रणनीतीचा. (स्वप्नलोकातील 'विवेक') (ओम्वेट, २००८). स्वप्नलोक म्हणजे केवळ भविष्याचे काल्पनिक चित्र नव्हे किंवा वास्तवापासून फारकत घेतलेला स्वप्नाळू प्रदेश नव्हे. स्वप्नलोक हे वास्तवात वसलेले असतात आणि त्याच वेळी ते वास्तवापलीकडे जात असतात. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की सामाजिक वास्तवात असलेल्या विषमतेला संबोधित केल्याशिवाय स्वप्नलोकांच्या दिशेने वाटचाल होऊ शकत नाही. डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे,'समाजातील विषमतेला आणि अन्यायाला दूर न करता नव्या समाजाच्या निर्मितीचे प्रयत्न म्हणजे जणू उकिरड्यावर राजवाडा बांधण्याचा प्रकार आहे.' (१९९५, खंड १४, १: १३२५) ओम्वेट यांचा स्वप्नलोक 'शहरी' आहे, समृद्ध आहे आणि सामूहिकतेच्या जाणिवेतून आकाराला आला आहे. पुस्तकाच्या उपसंहारात ओम्वेट असे प्रतिपादन करतात की, त्यांच्या अभ्यासातील सर्व बुद्धिवादी विचारवंत हे समृद्ध, लोकशाहीवादी, समाजवादी, विकासाभिमुख समाजाच्या वैशिष्ट्यांसह स्वप्नलोकाची मांडणी करतात. समतापूर्ण सहभाव असलेल्या भारतीय समाजाची ही पुनर्रचना आहे, असे त्या मानतात.

'बेगमपुरा' हे पुस्तकाचे शीर्षक रविदासांच्या एका कवितेतून आले आहे. या कवितेत कवी एका अशा दुःखविहीन शहराची कल्पना मांडतो, जिथे कोणतीच उतरंड नसेल आणि सारेजण समान असतील. जातविरोधी विचार मांडणाऱ्या बेगमपुरासारख्या स्वप्नलोकांचे विश्लेषण या पुस्तकात केले आहे. या पुस्तकाचे दुसरे प्रकरण आहे 'न्यू मेसेज'. या प्रकरणात लेखिकेने युरोपीय आधुनिकतेतील विचारांच्या समांतर, भारततही पंधराव्या ते सतराव्या शतकात आधुनिक सामाजिक विचारांची बीजे पेरली गेल्याचे मांडत त्या परंपरेचा आढावा घेतला आहे. हा काळ मुस्लिम राजवटीचा होता. या काळात मुस्लिम धर्माने कनिष्ठ जातींना स्वातंत्र्याचा अवकाश देत ब्राह्मणवादाला आव्हान देऊन वैचारिक प्रबोधन केले. बौद्ध तत्त्वज्ञानानेही ब्राह्मणवादातील मृत्यूपश्चात पारलौकिक आदर्श समाजाच्या कल्पनेला, कर्तव्याच्या धारणेला आणि अस्मितेच्या जाणिवेला छेद दिला. प्रत्यक्ष भौतिक जगात आदर्श समाजाचे रूप'सुखवत्ती' स्वप्नलोकाच्या माध्यमातून मांडले. सुफींनी हिंदू मुस्लिमांच्या संगमावर आधारित आपलं तत्त्वज्ञान जनसामान्यांच्या दररोजच्या जगण्याच्या माध्यमातून मांडलं. या पुस्तकाचे तिसरे प्रकरण आहे 'नामा'. या प्रकरणात कर्मकांडातून मुक्ती मिळवण्याच्या नामदेव, जनाबाई आणि चोखामेळा यांच्या प्रयत्नांवर, ऐहिक जगण्याचे महत्त्व सांगण्यावर आणि नाचून, गाऊन आणि

संभाषित

आनंदाने जगणं साजरं करण्याच्या पद्धतीवर लेखिकेने प्रकाश टाकला आहे. हे करताना संत दुःखासाठी आणि जातिवादासाठी देवाला जबाबदार धरतात, हे विशेष. चौथे प्रकरण आहे ते रविदास आणि कबीराविषयी. समताधिष्ठित नैतिकतेवर आधारलेले कबीराचे 'प्रेमनगर' आणि रविदासाचे 'दुःखविहीन शहर' या स्वप्नलोकांबाबत या प्रकरणात चर्चा केली आहे. तुकारामाच्या सत्याधिष्ठित विवेकाबाबत 'तुका' या पाचव्या प्रकरणात चर्चा केली आहे. 'कर्ताभजा' या सहाव्या प्रकरणात सुरुवातीच्या वासाहतिक काळापर्यंत मांडणी पोहोचते. जातसंस्था आणि वसाहतवाद यांच्यातील आंतरसंबंध, पुराणमतवादी हिंदू राष्ट्रवादाचा उदय, त्यांनी केलेले भक्ती चळवळीचे अपहरण, ब्राह्मो समाजाचा हस्तक्षेप आदी बाबींविषयी चर्चा केली आहे. 'दलित शुद्धवाद' या महत्त्वाच्या संकल्पनेबाबतही पश्चिम बंगालमधील मथुआ आणि त्यांच्या समृद्ध जीवनशैलीच्या संदर्भाने मांडणी केली आहे. या पुढे जात सातव्या प्रकरणात ज्योतिबा फुलेंच्या 'बळीचे राज्य' आणि 'सत्यशोधक समाज' या दोन स्वप्नलोकांविषयी चर्चा केली आहे. वासाहतिक तामिळनाडूमधील सामाजिक विचारांच्या संदर्भाने आठव्या प्रकरणात लेखिकेने मांडणी केली आहे. पंडित आयोथी यांच्या तमिळ लोकांसह केलेल्या सामूहिक बौद्ध धर्मांतरासह 'बौद्ध कॉमनवेल्थ' स्थापण्याच्या संदर्भात झालेल्या प्रस्तावाची चर्चा येथे केली आहे. आर्य महिला सभेच्या माध्यमातून पुण्याच्या बाहेर एका स्वप्नलोकाची कल्पना करणाऱ्या पंडिता रमाबाई यांच्या प्रयत्नांची नोंद लेखिकेने नवव्या प्रकरणात घेतली आहे. पंडिता रमाबाई धर्म आणि स्त्रिया यांचे संबंध, समुदाय आणि नैतिकता या संदर्भातील कळीचे प्रश्न उभे करतात. दहाव्या प्रकरणात इ. व्ही. रामास्वामी नायकर (पेरियार) यांच्या राष्ट्रउभारणी आणि स्वाभिमान आंदोलनाबाबतच्या (Self-Respect Movement) प्रयत्नांची चर्चा केली आहे. पुस्तकातील शेवटच्या अकराव्या प्रकरणात डॉ.आंबेडकरांच्या वैचारिक मांडणीचा वेध घेतला आहे. 'प्रबुद्ध भारत', राज्य- समाजवादाचा आर्थिक सिद्धांत आणि बौद्ध अर्थशास्त्रापर्यंतच्या त्यांच्या प्रवासाचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. डॉ. आंबेडकरांचे नाव हे संविधान सभेसोबत जोडले गेले आहे. भारतीय संविधानाच्या पानापानांतून भारतासाठीचा स्वप्नलोक मांडणे हेच काम जणू डॉ. आंबेडकरांनी केले असल्याचे दिसून येते.

ओम्वेट स्वप्नलोकाकडे आधुनिक संकल्पना म्हणून पाहतात. आधुनिकतेतील विरोधाभासांमधून स्वप्नलोकांचा जन्म होतो, असा अन्वय त्या लावतात. आधुनिकतेच्या श्रेय आणि अपश्रेय यांच्या सहअस्तित्वातून,

घुसळणीतून हे स्वप्नलोक उदयाला आले आहेत, असे लेखिकेचे प्रतिपादन आहे. थॉमस मूरच्या द *बेस्ट स्टेट ऑफ अ कॉमनवेल्थ ॲण्ड द न्यू आयलॅण्ड ऑफ युटोपिया*(१५१६ ते १५१८) या पुस्तकात आधुनिकतेबाबत संतुलित दृष्टिकोन मांडलेला आहे. भावना आणि विवेक यांची सांगड घालत तसेच वैशिष्ट्यांसह वैविध्यपूर्ण वैश्विकता अशा आधुनिकतेच्या ‘संतुलित’ स्वरूपातून सोळाव्या शतकातील पुनर्जागरण आकाराला आले, असे मूर मांडतो. मूरच्या या उल्लेखातून हे स्पष्ट होते की लेखिका वसाहतवाद, साम्राज्यवाद, युद्ध, भव्य आर्थिक ‘विकासा’च्या माध्यमातून परिघावरील समूहांचे शोषण करणाऱ्या युरोपकेंद्री एकसुरी आधुनिकतेच्या धोक्यांचे सूचन करत आहेत. लेखिका निर्वसाहतवादी दृष्टिकोनातून आधुनिकतेकडे पाहतात आणि सांस्कृतिक सापेक्षतावादाच्या धोक्यांच्या संदर्भात इशारे देतात. *सीकींग बेगमपुरा*च्या प्रस्तावनेतच ओम्वेट यांनी नोंदवले आहे की उत्तर-आधुनिकतेचे सिद्धांत आधुनिकतेच्या गौरवशाली धारणांच्या नावाखाली स्वप्नलोकच नाकारतात आणि हे करताना विषमता आणि अन्याय यांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळेच उत्तर आधुनिक चष्म्यातून भारतातील वैचारिक परंपरेतील समता आणि न्याय यांसारख्या मूल्यांना नाकारता येणार नाही.

*सीकींग बेगमपुरा* मार्क्स फुले आंबेडकरवादी पद्धतीशास्त्र किंवा वेबरप्रणीत पद्धतीशास्त्र वापरते. भौतिक-आर्थिक साधनांबाबतच्या विचारांबरोबरच इमल्यातील (superstructure) जातींच्या उच्चाटनाचा विचार हे पद्धतीशास्त्र कळीचे मानते. त्यातील निर्णायक आंतरक्रियांचा वेध घेते, असा ओम्वेट यांचा युक्तिवाद आहे. हा अभ्यास परिघावरील समूहांच्या सामाजिक विचारदृष्टीतून (a study in ‘subaltern’ social thought) केला आहे, अशी मांडणी ओम्वेट करतात. आधुनिक भारतीय वैचारिक परंपरेचा मागोवा घेत त्या जातविरोधी समताधिष्ठित स्वप्नलोकांचा शोध घेतात. भारतातील स्वप्नलोकांची मांडणी ही युरोपातील स्वप्नलोकांच्या उदयाच्या समकालीन होत होती, असे त्या मानतात. ओम्वेट यांची ही शोधयात्रा पंधराव्या शतकातील उत्तर आणि दक्षिण भारतातील भक्ती चळवळीपासून सुरू होते आणि तब्बल पाच शतकांच्या परंपरेचा आढावा घेत डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक दृष्टिकोनापर्यंत येऊन पोहोचते. अन्याय्य आणि उतरंडपूर्ण समाजात ‘राष्ट्र’ बांधणीचा प्रकल्प कसा निष्फळ आहे, हे त्या अधोरेखित करतात. भारतीय स्वातंत्र्य चळवळीची आणि स्वातंत्र्योत्तर राजकारणाचीही त्या या दृष्टीने चिकित्सा करतात. हे सांगताना त्या महात्मा फुलेंचा संदर्भ देतात.

*सार्वजनिक सत्यधर्म* या आपल्या पुस्तकात जातिअंतर्गतच विवाह करणाऱ्या विखंडित विषम समाजाबद्दल फुले म्हणतात,‘चित्रचिचित्र धान्यांच्या अठरा दाण्यांमधून एकसाची एकरंगी राष्ट्र कसे निर्माण होऊ शकते?’ (फुले, १९९१) उतरंडपूर्ण समाजात एकता आणि एकात्मता असलेले राष्ट्र निर्माण करणे अशक्य आहे. तसेच त्याच्या अट्टाहासातून एकच प्रस्थापित अभिजन संस्कृती सर्वांवर लादताना अनेक अल्पसंख्य वंचित समूहांचे अस्तित्व संपण्याचा धोका आहे. म्हणूनच ओम्वेट यांचा प्रकल्प हा पुनरुज्जीवनवादी नाही. एका ‘अधिक संतुलित आधुनिकते’सह (मूर) जागतिक दक्षिण गोलार्धातील/ भारतीय/ निर्वसाहतवादी दृष्टीतून समताधिष्ठित स्वप्नलोकांचे त्यांनी अवलोकन केले असल्याचे दिसून येते.

जातविरोधी विचारांचा उदय ‘जागतिकीकरणाच्या टप्प्यांवर’ झाला, असा त्यांचा युक्तिवाद आहे. त्यांच्या विश्लेषणात प्रामुख्याने जागतिकी-करणाच्या काळाचे दोन टप्पे आहेतः ओम्वेट यांच्या मते, पंधरावे ते सतरावे शतक आणि वसाहतवादाचा काळ हे भारताच्या संदर्भातील जागतिकीकरणाचे दोन टप्पे आहेत. या दोन्ही टप्प्यांमध्ये उद्योगधंद्यांची वाढ झाली आणि सत्तेच्या केंद्रीकरणाचा उदय झाला. राज्यसंस्थेचे राजकारण आणि बदललेली आर्थिक व्यवस्था यांमधून नव्या संधी निर्माण झाल्या तसेच शोषणाची नवी रूपेही उदयास आली. ओम्वेट यांच्या मते जागतिकीकरणाच्या प्रत्येक टप्प्याच्या सुरुवातीला जातविरोधी विचारांना चालना मिळाली. या दोन्ही टप्प्यांतून विचारांच्या देवाणघेवाणीकरता आणि भौतिक आदानप्रदानासाठीची सुपीक जमीन प्राप्त झाली. असे असले तरी मुस्लिम युग तसेच ब्रिटिश काळातही जागतिकीकरणाने पुढील टप्पा गाठला आणि तेव्हा वर्चस्वशाली समुदायांना आपले स्थान बळकट करता आले. ओम्वेट यांनी म्हटले आहे, या काळात ब्राह्मण वर्चस्व नव्याने प्रस्थापित झाले. विशेषतः शिक्षण आणि नोकरशाही या दोन्ही क्षेत्रात ब्राह्मण वर्चस्व अधिक दृढ झाले. जागतिकीकरणाच्या या टप्प्यांमध्ये एकूणात सत्ता संरचना पूर्णपणे बदलली नाही तरीही तिथे स्वप्नलोकांची कल्पना केली जाऊ शकते, अशी अवस्था निर्माण झाली. आज आपण जागतिकीकरणाच्या आणखी एका टप्प्यावर असून स्वप्नलोकांसाठी हा टप्पा अधिक पोषक आहे, असे ओम्वेट यांनी समारोप करताना म्हटले आहे. आता आपण ‘राष्ट्रवादी’ पवित्रा घेणार की भांडवलशाहीवर मात करतानाच वर्गबाह्य शोषणाचेही मार्ग लक्षात घेत नवा जागतिक समाजवादी समाज निर्माण करणार हा कळीचा सवाल लेखिका आपल्यासमोर उभा करतात.

भारताच्या संदर्भात गेल्या काही वर्षात समताधिष्ठित समाजनिर्मितीकरता भारतीय संविधान या प्रतीकाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. संविधानाची उद्देशिका ही भारतीय स्वप्नलोकाची संहिता आहे. स्वातंत्र्य, समता, सहभाव, न्याय, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद या मूल्यांची गाथा सांगणारी उद्देशिका ही सामूहिक परिवर्तनाची दिशा आहे. 'दुःखविहीन शहर' किंवा 'प्रेमनगर' हे विवेक आणि अत्यानंदाचे सशक्त आविष्कार आहेत. सत्योत्तर जगात आणि उन्मादी राष्ट्रवादाच्या काळात हे पुस्तक आपला स्वप्नलोक उभा करण्यासाठीचा मजबूत पाया उभा करते आणि त्यासाठीची अवजारेही आपल्या झोळीत टाकते.

**References**


1. Ambedkar, B. R. (1976- 2004). 'Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches' ed. Vasant Moon, 17 volumes, Mumbai: Government of Maharashtra.
2. More, Thomas (1516). 'The Best State of a Commonwealth and the New Island of Utopia', Complete Works of St. Thomas More, Vol. 4. Ed. Richard S. Sylvester, New Haven: Yale University Press. 1965.
3. Phule, Jotirao (1991). 'Mahatma Phule Samagra Wangmay' (Mahatma Phule's Collected Writings) ed. Y. D. Phadke, Mumbai: Maharashtra Rajya Sahitya ani Sanskruti Mandal.
4. Standing, Guy (2011). 'The Precariat: The New Dangerous Class', London: Bloomsbury Academic.

# आदरांजली

संशोधक

# भावेबाई

**लीना केदारे**

सहयोगी प्राध्यापक व प्रमुख
मराठी विभाग
रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, मुंबई
leenakedare@gmail.com



लोकशाही समाजवादी मूल्यभान रुजवू पाहणारा स्वातंत्र्योत्तर काळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, साठीच्या दशकातील साहित्य-सामाजिक-राजकीय क्षेत्रातील गतिमान घडामोडी, दलित पँथरने सत्तासंबंधांना दिलेले हादरे, पाठोपाठ भारतीय समाजजीवनाला नियंत्रित करू पाहणारी पंच्याहत्तरमधील आणीबाणी, महाराष्ट्राचे अशा सामाजिक-राजकीय वास्तवाला सन्मुख होत न्यायाच्या बाजूने हस्तक्षेप करत वेळोवेळी आपली राजकीय भूमिका अदा करणारे प्रखर व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. पुष्पा भावेबाई!रुईया महाविद्यालयातील मराठीच्या उत्तम शिक्षिका आणि नाट्यसमीक्षक म्हणून नावाजलेल्या भावेबाई मानवी हक्कांसाठी झगडणार्या सर्वच चळवळींना एकाचवेळी 'आपला आवाज' वाटत आल्या आहेत आणि असे उदाहरण विरळा आहे.

रुईया महाविद्यालयामध्ये शिकत असताना मराठीच्या शिक्षिका म्हणून भावेबाई पहिल्यांदा भेटल्या. त्यांची वर्गातील व्याख्याने साहित्याची मर्मदृष्टी देण्याबरोबरच समाजभान कोरणारी होती. त्यापूर्वी बाईविषयी अनेकांकडून इतकं समजलेलं होतं की, बाईंबरोबर बोलताना साहजिकच आम्हा विद्यार्थ्यांवर दडपण येत असे. अर्थात हे दडपण बाईंपासून दूर घेऊन जाणारं नव्हतं, तर बाईंचं एक वेगळ्या प्रकारचं वैचारिक, संघर्षशील आकर्षण निर्माण करणारं होतं. जीवनामध्ये पुढे आमच्यासारख्या विद्यार्थिनींनी जे धाडसाने वेगवेगळे निर्णय घेतले त्याला बाईंचे आमच्या मनावर जे अप्रत्यक्ष वैचारिक संस्कार झाले, ते कारणीभूत होते. आजही एखादा पेच समोर आला की नैसर्गिक प्रेरणेने आधी भावनेने विचार केला जातो पण पुढच्याच क्षणी एक मन जागं होऊन म्हणतं की आपल्या बाईंनी या प्रसंगी काय निर्णय घेतला असता? आणि मग सर्व काही लख्ख झाल्याचा अनुभव येतो. त्यांनी आमचं अंतर्मन घडवलंय...आम्हांला

कणखर बनवलंय...अगदी संवेदनशील वयात त्यांच्यासारखा मेधावी शिक्षक लाभणं, हे खूप समृद्ध करणारं होतं. त्यामुळे शिकता शिकता शिकवावं कसं याचा वस्तुपाठ आम्हाला सहज मिळाला.

भावेबाई, गोखलेबाई या दोन्ही आमच्या मराठीच्या अध्यापकांनी मराठीचे अनेक अध्यापक घडवलेले आहेत. मुंबईतल्या अनेक महाविद्यालयांमध्ये, शाळांमध्ये असणारे मराठीचे अनेक शिक्षक हे बाईंचे विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी बाईंचे वैचारिक ऋण नक्कीच मान्य करतील. अनेकदा बाईंच्या आम्हा सर्व विद्यार्थ्यांना 'भावे-गोखले स्कूल'चे विद्यार्थी म्हटलं जातं, ज्याचा आम्हांला सार्थ अभिमान आहे.

भावेबाई गेल्यामुळे आमचं स्कूल पोरकं झाल्याची भावना मनामध्ये आहेच. कारण भावेबाई या एक व्यक्ती नव्हत्या, तर एक संस्थाच होत्या. विद्यार्थ्यांना विविधांगांनी घडवणारी संस्था. अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर व्हायला हवं, स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायला शिकलं पाहिजे हे आपल्या कृतीतूनच बाईंनी आम्हांला दाखवलं आहे. आपल्याला जर एखादी गोष्ट पटली तर इतरांचा कितीही विरोध असला तरी त्या गोष्टींच्या बाजूने ठाम उभं राहिलं पाहिजे, त्यासाठी संघर्ष केला पाहिजे हे बाईंनी स्वतःच्या वर्तनातून आमच्यासमोर मूर्त केलं. आम्ही विद्यार्थी असताना 'रमेश किणी प्रकरण' घडलं. या प्रकरणामध्ये बाईंना जे सोसावं लागलं ते आम्ही प्रत्यक्ष पाहिलं आहे. एका मोठ्या राजकीय पक्षाबरोबर संघर्ष करताना बाई अजिबात विचलित झाल्या नाहीत. उलट सर्वसामान्य माणसालाही न्याय मिळाला पाहिजे आणि त्यासाठी सर्वांनी उभं राहायला पाहिजे ही भूमिका आपोआप आमच्या मनामध्ये त्यांनी निर्माण केली.

मंडल आयोग जाहीर झाल्यानंतर त्यांनी महाविद्यालयात एक मोठा कार्यक्रम घेतला होता आणि या आयोगाचे महत्त्व अनेक वक्त्यांकरवी आमच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. बाईंना बहुजन समाजाबद्दल वाटणारी कळकळ तसेच सामाजिक प्रश्नांच्या विविध आयामांना समजून घेण्यातील विवेकी अपरिहार्यता त्यांच्या मांडणीतून आम्हाला कळत होती. समाजातील अनेकस्तरीय प्रश्नांना भिडताना कोणी कितीही जहरी टीका केली तरी अत्यंत शांतपणे परंतु ठामपणे त्यांना उत्तरं देण्यातील बाईंचा रास्त निर्भीडपणा त्यांच्या कणखरपणाचाच आविष्कार होता.

बाईंचं व्यक्तिमत्त्व एकारलेलं नव्हतं. अध्यापनाच्या कामामध्ये कार्यरत असतानाच बाईंनी सामाजिक – राजकीय पर्यावरणावर आपली नाममुद्रा

उमटविली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला असणाऱ्या विविध पैलूंचा आढावा घेतल्यास तर्ककठोर विचारवंत, प्रामाणिक कार्यकर्ता, रंगभूमीच्या भाष्यकार, स्त्री चळवळीच्या खंद्या पुरस्कर्त्या या आयामांसोबतच अनेक सामाजिक चळवळींचा आधारस्तंभ म्हणून भावेबाई ओळखल्या जातात. दबलेल्या वर्गाचा आवाज बनणं हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ठळकपणे दिसून येतं आणि म्हणूनच असंघटित कामगार चळवळ, हमाल, रिक्षावाले, कागद-काच-पत्रावेचक कष्टकर्यांच्या आंदोलनात त्यांची भूमिका मोलाची ठरली. त्याचबरोबर कामगार चळवळीचा संघर्षही त्यांनी आपला मानला. आणीबाणीविरोधी आंदोलन असो की मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नावरील चळवळ असो बाईंची भूमिका स्पष्ट होती. मंडल आयोग जाहीर झाल्यावर त्याच्या समर्थनार्थ त्यांनी अनेक ठिकाणी सामाजिक रोष पत्करून भाषणे केली. एकूणच अनेक सामाजिक चळवळींचा आधारवड म्हणून छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांना बाईंचा नेहमीच आधार वाटत राहिला.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती, केशव गोरे स्मारक ट्रस्ट, स्वाधार, पुकार (सामाजिक क्षेत्र संशोधन संस्था), मानवी हक्कांसाठी काम करणारी 'मेहेर' ही संस्था, य. दि. फडके संशोधन केंद्र, आगरकर न्यास, टाटा समाजविज्ञान संस्था, मृणाल गोरे साऊथ एशियन सेंटर, भारत - पाकिस्तान पीपल्स फोरम फॉर पीस अँड डेमोक्रसी, साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र अशा अनेकानेक संस्थांशी बाई पदाधिकारी, सल्लागार, हितचिंतक म्हणून जोडलेल्या होत्या. त्याअर्थाने महाराष्ट्राचे विचारपीठ घडवण्याचं श्रेय त्यांना दिल्यास अतिशयोक्त ठरणार नाही. यापैकी केशव गोरे स्मारक ट्रस्ट, स्वाधार, अंनिस,साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र यांच्या काही कार्यक्रमात बाईंबरोबर प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली. त्यातून खूप काही शिकायला मिळालं. एखादा विषय ठरवला तर त्यासाठी योग्य वक्ता सांगताना त्या सहजपणे महाराष्ट्राबाहेरचीही नावं घेत आणि बाईंकडे या सार्या मंडळींचा संपर्क असे.

रुईया महाविद्यालयात मराठी विभागात मी विभागप्रमुख झाल्यानंतर विष्णुशास्त्री चिपळूणकर स्मारक व्याख्यानमालेसाठी विषय ठरल्यावर त्यांनी अनेकदा मला वक्ता मिळवण्यासाठी मार्गदर्शन दिले आणि मदतही केली. ही व्याख्यानमाला त्यांच्या जिव्हाळयाचा विषय होता. सेवानिवृत्तीनंतरही त्या आवर्जून शक्य तितक्या सर्व व्याख्यानांना उपस्थित राहत असत.

मराठी भाषा आणि साहित्य हा बाईंच्या अभ्यासाचा विषय असला, तरी एकूणच रंगभूमी आणि नाटक हे त्यांना अधिक जवळचे वाटणारे होते आणि

अनेक प्रसिद्ध रंगकर्मी, दिग्दर्शक, नट यांच्याशी बाईंचा सतत संवाद चालत असे. आपल्या कलाकृतींविषयी बाईंचं म्हणणं काय आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता सर्वच रंगकर्मींना वाटत असे. नाट्यसमीक्षक म्हणून बाईंनी स्वतःचा एक ठसा नाट्यक्षेत्रात निर्माण केला होता. म्हणूनच त्यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त २०१४ साली आम्ही 'नाटक : एक शाश्वत कला' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र घेऊन आमच्या मनातील कृतज्ञता व्यक्त केली होती. अर्थात त्यांनी शिक्षक म्हणून अनेक पिढ्यांना जे ज्ञान दिलं आहे त्याचे ऋण कायमच राहील.

'आम्हांला भेटलेले डॉक्टर श्रीराम लागू' आणि 'रंग नाटकाचे' ही त्यांची दोन पुस्तके त्यांच्या रंगभूमीकडे पाहण्याच्या दृष्टीचा परिचय करून देण्यास पुरेशी आहेत. खरंतर लेखनापेक्षा बोलणं हा बाईंचा सहज स्वभावधर्म होता. त्यामुळेच अनेक सामाजिक प्रश्नांवरती त्यांची परखड आणि स्वच्छ मतं जाणून घ्यायला प्रसारमाध्यमं उत्सुक असत आणि बाईदेखील अतिशय गोळीबंद, नेमके, सुस्पष्ट आणि ठाम विवेचन करत असत. अनेक विद्यापीठीय चर्चासत्रांमध्ये बाईंनी केलेली बीजभाषणं त्यांच्या विचारांचा नेमकेपणा प्रत्ययाला आणून देत असत. 'विचारांचा प्रतिवाद विचारांनी करायचा' ही त्यांची भूमिका त्यांनी नेहमीच जपली. कलाक्षेत्रातील मंडळी असो की सामाजिक क्षेत्रातील किंवा त्यांचे विद्यार्थी असोत कोणीही व्यक्ती सल्ला मागायला बाईंकडे गेल्यानंतर बाईंनी कोणावरही आपली मतं कधीच लादली नाहीत. प्रत्येकाला विचार करून आपले मत ठरवण्याचा अधिकार आहे आणि त्याने समोरच्या व्यक्तीचे दडपण न घेता तो बजावला पाहिजे असे त्यांना नेहमी वाटत असे. आपल्या झेरॉक्स प्रती निर्माण होऊ नये, आपला प्रभाव सकारात्मक असावा याची त्या कसोशीने काळजी घेत असत. आपल्याला न पटणाऱ्या भूमिकेचे समर्थन त्यांनी कधीही केले नाही आणि कितीही धमक्या आल्या तरीही त्यांना कधी सुरक्षा मागावी असं वाटलं नाही. त्यांचा हा बाणेदारपणा अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी नयनतारा सेहगल यांना पाठिंबा देण्यासाठी अगदी अलीकडेच घेण्यात आलेल्या 'एल्गार सभे'तही दिसून आला.

सतत कार्यशील राहणं, सामाजिक कामांकरता महाराष्ट्रभर, भारतभर फिरस्ती करणं आणि हे सर्व करत असताना एकूण साहित्य व्यवहारावर, कला व्यवहारावर नजर ठेवून असणं हे बाई कसे जमवत होत्या हे आजही न उलगडलेलं कोडं आहे. एवढ्या आजारी असतानाही त्या सतत वाचन -लेखनामध्ये मग्न असायच्या. या आजारपणात त्यांना भेटल्यानंतर त्यांच्याकडून हमखास

विचारला जाणारा प्रश्न म्हणजे नवीन काय वाचले, नवीन काय पाहिले हाच असायचा. त्यामुळे त्यांच्यातला शिक्षक आणि त्यांच्यातला कार्यकर्ता त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत जिवंत होता हा अनुभव त्यांच्या सहवासात असणाऱ्या अनेकांना घेता आला.

बाईंनी मोजकंच लेखन केलं आहे. नाट्यविषयक लेखनाबरोबर सामाजिक जाणिवेतून 'गुड मुस्लीम - बॅड मुस्लीम' या महमूद ममदानीलिखित पुस्तकाचा मिलिंद चंपानेरकर यांच्यासोबत बाईंनी अनुवादही केला. बाईंनी अजून लेखन करायला हवं होतं, असं मात्र खूप वाटतं. कारण त्यांच्या आयुष्यभराच्या चिंतनाचं सार त्यात आलं असतं. तरीही जी काही त्यांची साहित्यसंपदा आजमितीला उपलब्ध आहे त्यावरून त्यांच्या व्यासंगाची आणि विचक्षण समीक्षकी दृष्टीची साक्ष मिळतेच.

अलीकडे मेधा कुलकर्णी यांनी घेतलेल्या बाईंच्या मुलाखतीवर आधारित 'लढे आणि तिढे' या पुस्तकात त्यांच्या कार्याचा पट आपल्यासमोर उलगडतो. अहिल्याताई रांगणेकर, मृणाल गोरे, बाबा आढाव, नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे इत्यादी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांसोबतचा त्यांचा प्रवास आणि महाराष्ट्राच्या घडणीची नोंद या पुस्तकात जुळून आलेली आहे. याच प्रकारे काळाच्या एका मोठ्या पटलावर क्ष-किरण टाकण्याचे काम मिड-डे या दैनिकाने भावेबाईंवर केलेल्या 'अ गर्ल फ्रॉम दादर टू आयर्न लेडी' या माहितीपटाद्वारेही घडले आहे. एका व्यक्तीच्या जगण्याला किती आयाम असावेत याचा थक्क करणारा हा अतिशय धावता आणि त्रोटक आढावा आहे, याची मला जाणीव आहे. लेखाच्या समारोपात इतकेच म्हणावेसे वाटते की, बाईंनी आपल्याला दिलेला विवेकाचा बुलंद आवाज पुढच्या पिढ्यांपर्यंत सक्षमपणे पोहोचवण्याची जबाबदारी आपली अर्थात बाईंच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष विद्यार्थ्यांची आहे.

# लेखक परिचय

**अभिजीत देशपांडे**

अभिजीत देशपांडे हे के. जे. सोमैया कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. सध्या मुंबई विद्यापीठातून विद्यावाचस्पती पदवीकरिता 'कादंबरी ते चित्रपट - एक कथनात्म विश्लेषण' या विषयावर त्यांचे संशोधन कार्य सुरू आहे. त्यांनी *आजची कविता* या नावाने आठ काव्यपुस्तकांची मालिका संपादित केली आहे. वसंत आबाजी डहाके यांच्या निवडक कवितांचे संकलन व संपादनही केले आहे. त्यांचे *एक होता कारसेवक* नावाचे आत्मकथन प्रकाशित आहे. त्यांनी मराठीतील अग्रगण्य नियतकालिकांमध्ये भाषिक, साहित्यिक तसेच चित्रपटसंबंधित विषयांवर विस्तृतपणे लेखन केले आहे. त्यांनी भाषा, साहित्य आणि चित्रपटासंबंधित विषयांवर अनेक व्याख्याने दिली आहेत आणि कार्यशाळांचे आयोजनही केले आहे. त्यांनी चित्रपट महोत्सवाच्या निवड समितीवर काम केले आहे. २०१५ ते २०१८ या कालावधीत *वास्तव रूपवाणी* या चित्रपटाशी संबंधित नियतकालिकाचे संपादक म्हणून कार्यरत होते. के. जे. सोमैया कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्सच्या पुढाकाराने सोमैया विद्याविहारची फिल्म सोसायटी असलेल्या 'दृष्टी फिल्म फोरम'चे संस्थापक तसेच 'प्रभात चित्र मंडळा'चे कार्यकारी समिती सदस्य आहेत.

**ज्योती रोटे**

ज्योती रोटे या ना. ग. आचार्य व दा. कृ. मराठे महाविद्यालय, चेंबूर येथे मराठीच्या साहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. 'प्रकाश नारायण संत यांचे कथाविश्व (*वनवास* या कथासंग्रहाच्या संदर्भात)' या विषयावर मुंबई विद्यापीठातून एमफिल पदवीकरिता संशोधन केले आहे. सध्या मुंबई विद्यापीठातून पीएचडी पदवीकरिता 'लोकप्रिय साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा (स्वातंत्र्योत्तर लोकप्रिय मराठी कादंबरीच्या विशेष संदर्भात)' या विषयावर त्यांचे संशोधन कार्य सुरू आहे.

**प्रतिमा जोशी**

प्रतिमा जोशी *महाराष्ट्र टाईम्स* या मराठी वृत्तपत्राच्या नामवंत पत्रकार आहेत. सामाजिक प्रश्नांवर कार्य करणाऱ्या सक्रिय कार्यकर्त्या, विचारवंत आणि कथाकार आहेत. त्यांच्या *जहन्नम - निवडक प्रतिमा जोशी* (संपादक पुष्पा भावे) या कथासंग्रहाला २०१० सालचा केशवराव कोठावळे पुरस्कार प्राप्त झाला आहे. यांशिवाय त्यांचे *अज्ञाताचा प्रवासी* (अनुवादित), *इराण जागा होतोय* (अनुवादित), *दण्डकारण्य* (कथासंग्रह), *शोध बाईमाणसाचा* (वैचारिक) इत्यादी ग्रंथही प्रसिद्ध झाले आहेत. प्रतिमा जोशी विद्यार्थीदशेपासून लोकशाही समाजवादी विचारांशी बांधील असणाऱ्या सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर

संवादिन

प्रश्नात 'नामांतर व्हावे' या मागणीसाठी लढा दिल्याने त्यांना अटक होऊन पुण्याच्या येरवडा जेलमध्ये पंधरा दिवसांचा कारावास भोगला आहे. तसेच दोन दशकाहून अधिक काळ देहविक्रय करणाऱ्या मुली, देवदासी व त्यांची मुले यांच्या आरोग्य, शिक्षण, पुनर्वसन आदी प्रश्नांवर काम केले आहे. अंधश्रद्धा निर्मूलन, दलित अत्याचार, असंघटित कामगार, सफाई कामगार, एकल महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटनांसोबत त्या कार्यरत असून 'सत्यशोधक मनोहर कदम प्रागतिक संशोधन केंद्र' या संस्थेच्या अध्यक्ष आहेत. या एकूण कार्यासाठी मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कार, 'दूरदर्शन सह्याद्री वाहिनी'तर्फे हिरकणी पुरस्कार, पत्रकारितेसाठी 'मुंबई मराठी पत्रकार संघा'सह अन्य राज्यस्तरीय मान्यवर संस्थांचे राज्यपातळीवरील एकंदर नऊ पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

**श्रुती पानसे**

श्रुती पानसे 'न्यूरॉन्स ॲक्टिव्हिटी ॲन्ड रिसर्च सेंटर' येथे कार्यरत असून *ब्रेनेरिया लेक्चर्स* ही online lecture series त्यांनी सुरू केली आहे. 'लर्न महाराष्ट्र' या प्रकल्पाअंतर्गत बालवाडी ते इयत्ता सातवीसाठी दहा पूरक पुस्तिकांचे लेखन केले आहे. मुलांची जडणघडण आणि पालकत्व या विषयावर त्यांची १८ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. एक ते आठ वयोगटातील मुलांसाठीच्या *चिकूपिकू* या मासिकाचे संपादन. आणि *Dr Shruti Panse* हे यू ट्यूब चॅनल त्यांच्या नावे सुरू आहे.

**नेहा सावंत**

नेहा सावंत या मुंबईतील भवन्स महाविद्यालय, अंधेरी येथे मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळत असून अठ्ठावीस वर्षे अध्यापनाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचे *जिवलग* हे व्यक्तिचित्रणात्मक लेखांचे पुस्तक प्रकाशित आहे. त्यांनी *मास्तरांची सावली* (कृष्णाबाई सुर्वे), *सांगायची गोष्ट म्हणजे* (हिरा दया पवार), *नोहे एकल्याचा खेळ* ( डॉ. प्रकाश खांडगे) या आत्मकथनांचे शब्दांकन केले आहे. तर *कहाणी कवितेची* या नारायण सुर्वेलिखित काव्यविषयक लेखांचे संकलन व संपादनही केले आहे. विविध दिवाळी अंक, वाङ्‌मयीन नियतकालिके व वर्तमानपत्रांतून त्यांचे पुस्तकपरीक्षणपर लेख, शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. लेखनाव्यतिरिक्त अभिनय, डबींग या कलाक्षेत्रांतही त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. २००३ सालच्या राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त *नारायण गंगाराम सुर्वे* लघुपटात त्यांनी कृष्णाबाई सुर्वे ही भूमिका केली होती. *धोबीघाट*, *कच्चा लिंबू* या हिंदी तसेच *रिटा, सेकंड इनिंग* या मराठी चित्रपटांत व राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त *कोर्ट* या चित्रपटातही अभिनय केला आहे. नेहा सावंत चित्रपट, माहितीपट, मालिका व जाहिरात या क्षेत्रांसाठी अनेक वर्षांपासून डबिंगचे काम करीत असून त्या मुलाखती व काव्यवाचनाचे कार्यक्रमही सादर करतात.

**मारुती बाबूराव शेळके**

प्रा. मारुती बाबूराव शेळके यांनी मुंबईतील एल. एस. रहेजा स्कूल ऑफ आर्टमधून फाईन आर्ट या विषयात जी डी आर्ट (१९९३) केले असून, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशन (१९९४), तसेच नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातून एमएफए पदवी (२००२) पूर्ण केली आहे. बाल कामगार, ग्रामीण आणि स्लम भागातील समस्या आणि संस्कृतीचे ते अभ्यासक असून भारतीय संस्कृती व कला या विषयांवर विविध दिवाळी अंकांत व संकेतस्थळांवर हिंदी आणि मराठीमध्ये प्रसंगोपात्त लेखन केले आहे. त्यांना गेल्या सत्तावीस वर्षांपासून कला अध्यापनाचा अनुभव असून ते मुंबईतील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथे कलाशिक्षक प्रशिक्षण विभागात अधिव्याख्याता म्हणून कार्यरत आहेत. त्यांची आतापर्यंत सात एकल चित्रप्रदर्शने आणि पंधरापेक्षा जास्त सामूहिक चित्रप्रदर्शने प्रदर्शित झाली असून अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चित्रप्रदर्शनांत त्यांनी सहभाग नोंदवला आहे. जगभरातील अनेक ऑक्शन हाऊसमधील ऑक्शनमध्येही त्यांच्या चित्रांचा सहभाग झालेला आहे. 'विदर्भ साहित्य संघ', 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया' आणि 'विश्व मराठी परिषदे'चे आजीवन सदस्य आहेत. ते ललित कला अकादमीच्या जनरल बॉडीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत असून आयसीसीआरच्या मुंबई सल्लागार समितीचे सदस्य आहेत.

**राही श्रुती गणेश**

राही श्रु. ग. या राज्यशास्त्र आणि समाजशास्त्राच्या अभ्यासक असून *आपलं आयकार्ड* या पुस्तकाच्या लेखिका आहेत. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून त्यांनी पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. *दिव्य मराठी दैनिका*मध्ये त्यांचे 'हस्तक्षेप' हे सदर प्रसिद्ध झाले आहे. झारखंडमधील आदिवासी मुलामुलींच्या शिक्षणासंबंधित राज्य समाजकल्याण विभाग पुरस्कृत 'सहपाठी' या प्रकल्पाच्या त्या समन्वयक होत्या. विविध वर्तमानपत्र, मासिके आणि नियतकालिकांमध्ये त्या नियमितपणे लेखन करतात. भारतीय संस्कृती, कला, सामाजिक आंदोलने, राजकारण आणि शिक्षण हे त्यांचे अभ्यासविषय आहेत.

**लीना चिंतामण केदारे**

लीना केदारे या मुंबईच्या सुप्रतिष्ठित रामनारायण रूईया स्वायत्त महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत असून गेली पंचवीस वर्षे अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांनी '१९७५ नंतरची स्त्री चळवळ आणि त्याचा मराठी नाटकांवरील प्रभाव' (संजय पवार, जयंत पवार आणि प्रशांत दळवी यांच्या नाट्यलेखनासंदर्भात) या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून विद्यावाचस्पती ही पदवी सुवर्णपदकासह मिळवली आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय चर्चासत्रांमध्ये अनेक शोधनिबंध सादर केले असून विविध वृत्तपत्रे, वाङ्मयीन नियतकालिके आणि विविध ग्रंथांमध्ये त्यांनी लेखन केले आहे. मुंबई विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागात (दूरशिक्षण विभाग) आणि अमराठी भाषकांसाठी असणाऱ्या मराठी प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठीही अध्यापन केले आहे.

# संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना

'संभाषण' मासिकासाठी शोधनिबंध लिहिताना शोधनिबंधकाराने **In Text parenthetical Author-Date citation** या संदर्भ पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य आहे.

**In Text parenthetical Author-Date Citation** ही संदर्भ देण्याची अधिक सुटसुटीत पद्धत आहे. या पद्धतीनुसार प्रत्यक्ष लेखातील मजकुरामध्ये वा विवेचनामध्ये संदर्भांचे आधार देणे अभिप्रेत असते. या पद्धतीने संदर्भ देताना लेखकाचे आडनाव, संदर्भग्रंथाचे प्रकाशनवर्ष आणि उद्धृत संदर्भाचा पृष्ठ क्रमांक नोंदविणे आवश्यक असते.
उदाहरणार्थ,
(रेगे २००४ : ७५)
सदर संदर्भग्रंथाविषयीचे अन्य तपशील लेखाच्या शेवटी जोडलेल्या संदर्भांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जातात.
उदाहरणार्थ,
रेगे, मे. पुं. (२००४) **:** *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह**,** मुंबई.

शोधनिबंधाच्या शेवटी संदर्भसाधने नमूद करताना मराठी आणि इंग्रजी भाषेतील संदर्भांची स्वतंत्र नोंद करावी. तसेच ही माहिती देताना ग्रंथ (स्वतंत्र, संपादित इत्यादी), नियतकालिक, वर्तमानपत्र, अप्रकाशित प्रबंध, प्रबंधिका, संकेतस्थळ आणि समाजमाध्यम हा क्रम पाळावा.

**संदर्भ देताना ग्रंथकाराच्या,/संपादकाच्या आडनावाने प्रारंभ करून आडनावानुक्रमे नोंद करणे आवश्यक आहे.**
उदाहरणार्थ,
मतकरी, रत्नाकर (१९८३) : *स्पर्श अमृताचा*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
मनोहर, श्याम (१९८३) : *हे ईश्वरराव...हे पुरुषोत्तमराव...*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

**एकाच लेखकाच्या एकाहून अधिक पुस्तकांचे संदर्भ येत असतील तर वर्षानुक्रम पाळावा.**
उदाहरणार्थ,
नेमाडे, भालचंद्र (१९८७) : *साहित्याची भाषा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद .
नेमाडे, भालचंद्र (१९९०) : *टीकास्वयंवर*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

**एका लेखकाच्या एकाच वर्षातील एकाहून अधिक ग्रंथांचा, लेखांचा संदर्भ येत असेल तर पुढीलप्रमाणे लिहावे.**

उदाहरणार्थ,

पाटील, गंगाधर (१९९१ अ) : 'चिन्हमीमांसा', *अनुष्टुभ*, मार्च –एप्रिल, पृ. ३-६.

पाटील, गंगाधर (१९९१ आ) : 'कथनमीमांसा', *अनुष्टुभ*, दिवाळी अंक, पृ. ८६ -१२७.

एकाच साधनाचा संदर्भ लागोपाठ येतो तेव्हा 'तत्रैव' शब्द वापरून पृष्ठ क्रमांक द्यावा. उदाहरणार्थ, लेखात एखाद्या पुस्तकाचा संदर्भ पहिल्यांदा येत असेल तर तो (मुक्तिबोध १९९७ : ३१) अशा पद्धतीने नोंदवावा. हाच संदर्भ सलग आल्यास (तत्रैव, पृ. ४९) असे लिहावे.

**लेखाच्या शेवटी देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या संदर्भसाधनांच्या नोंदींची प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. ही उदाहरणे देत असताना IN-TEXT-CITATION पद्धतीनुसार प्रत्यक्ष विवेचनात संदर्भ कसे द्यायचे यासंबंधीचे नमुनेही देण्यात आले आहेत.**

ग्रंथ (book)

**एक लेखक**

रेगे, मे. पुं. (२००४) : *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(रेगे २००४ : २५)

**दोन लेखक**

मालशे, मिलिंद व जोशी अशोक (२००७) : *आधुनिक समीक्षा सिद्धांत*, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(मालशे व जोशी २००७ : ७८)

**संपादक (एक)**

जोशी, महादेवशास्त्री (संपा.) (१९६२) : *भारतीय संस्कृतिकोश- खंड १*, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे.

**IN-TEXT-**CITATION

(जोशी १९६२ : ६०)

**संपादक (दोन)**

भोळे, भा. ल. व बेडकिहाळ किशोर (संपा.) (२००३) : *बदलता महाराष्ट्र*, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

**IN-TEXT-**CITATION

(भोळे व बेडकिहाळ २००३ : ३६)

**संपादक (दोनापेक्षा अधिक असल्यास)**

नाईक, राजीव व इतर (संपा.) (१९८८) : *रंङ्गनायक,* आविष्कार प्रकाशन, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक व इतर १९८८ : ५९)

**संपादित ग्रंथातील लेखाचा संदर्भ**

केळकर, अशोक (१९८१) : 'भाषावैज्ञानिक संशोधनाच्या नव्या दिशा', *भाषा व साहित्य : संशोधन,* वसंत जोशी (संपा.) , महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ. ४७-६८.

IN-TEXT-**CITATION**

(केळकर १९८१ : ५०)

**अनुवादित**

आंबेडकर, बाबासाहेब (२००५) : दु. आ., *जातिव्यवस्थेचे विध्वंसन*, गौतम शिंदे (अनु.), सुगावा प्रकाशन, पुणे.

IN-TEXT-**CITATION**

(आंबेडकर २००५ : ३८)

**संपादित आणि अनुवादित ग्रंथ**

बापट, पु. वि. (संपा.) (२००१) : *धम्मपद,* पु. मं. लाड (अनु.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(बापट २००१ : १५)

नियतकालिकातील लेख

चौसाळकर, अशोक (२०१९) : 'चिनी क्रांतीची ७० वर्षे', *समाज प्रबोधन पत्रिका,* ऑक्टोबर-डिसेंबर, पृ. ३-११.

पळशीकर, सुहास (२०२०) : 'नागरिकत्वविषयक दुरुस्तीचे वास्तव', *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. १८ -२४.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(चौसाळकर २०१९ : ७)

(पळशीकर २०२० : २१)

**वर्तमानपत्रातील लेख**

नाडकर्णी, कमलाकर (२०२०) : 'होय, बालरंगभूमीही 'प्रायोगिक' होती!', *लोकसत्ता*, २४ मे, पृ. १२.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाडकर्णी २०२० : १२)

**ग्रंथपरिचय**

फडके, अनंत (२०२०) : 'विकासनीतीची कठोर चिकित्सा (पूर्वार्ध)' अच्युत गोडबोले यांच्या *अन्वर्थ -विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर?* या पुस्तकाचे परीक्षण, *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. ४६-४९.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(फडके २०२० : ४८)

### मुलाखत

केतकर, कुमार (२०१७) : ‘मार्क्स : प्रभाव आणि परिणाम’ शेखर देशमुख (मुलाखतकार), *साधना*, मे, पृ. २२-२३.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(केतकर २०१७ : २२)

### भाषण

दरेकर, प्रविण (२०१४) : ‘चांगल्या शैक्षणिक धोरणाची राज्याला आवश्यकता आहे!’, *विधिमंडळातील राजगर्जना,* नवता प्रकाशन, मुंबई, पृ. ५४-५७.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(दरेकर २०१४ : ५५)

### अप्रकाशित प्रबंध आणि प्रबंधिका

नाईक, कृष्णा बाबली (२०१६) : ‘रत्नाकर मतकरींच्या गूढकथा : स्वरूप आणि अभ्यास’, अप्रकाशित प्रबंध, मुंबई विद्यापीठ.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक २०१६ : ८७)

संज्ञापित


## वेबसाईट संदर्भ

**संकेतस्थळावरील परीक्षण**

आळवेकर, एकनाथ (२०१८) : 'रिंगाण : उत्क्रांतीची नवी दिशा देणारी कादंबरी', पीडीएफ.

http://vivekresearchjournal.org/current_issue.html

(संकेतस्थळाला भेट २७ फेब्रुवारी २०१९)

IN-TEXT-**CITATION**

(आळवेकर २०१८)

**संकेतस्थळावरील लेख**

कुलकर्णी, हेरंब (२०२०) : 'शिक्षणाची कक्षा आणि कक्षेचे शिक्षण'

http://herambkulkarniarticles.blogspot.com/2020/01/blog-post_4html?m=1

(संकेतस्थळाला भेट २८ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(कुलकर्णी २०२०)

**संकेतस्थळावरील पुस्तक**

मनोहर, यशवंत (२०१२) : *विचारसत्ता*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

http://yashwantmanohar.com/pdf/Bauddha%20Sanskruti%20Ani%20Sah itya.pdf

(संकेतस्थळाला भेट १५ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(मनोहर २०१२)

**संकेतस्थळावरील वर्तमानपत्र**

हेमाडे, श्रीनिवास (२०२०) : 'परीक्षा - विद्यार्थ्यांची आणि अस्तित्वाची'

**https://** www.esakal.com/sampadakiy/shrinivas-hemade-article-about-student-299349

(संकेतस्थळाला भेट ३० मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(हेमाडे २०२०)

**समाजमाध्यम**

बोरगावे, दीपक (२०२०) : ‘रोमान याकोबसन आणि भाषांतर अभ्यास’

http://www.facebook.com/story.php?story_fbid=18731

संभाषित

अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय,
मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस,
विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.

**© 'संभाषित' या तज्ज्ञपरीक्षित संशोधन-पत्रिकेतील (Peer-Reviewed Research Journal) कोणत्याही मजकुराचे पुनर्मुद्रण पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.**

**लेख पुढील ई-पत्त्यावर (Email) पाठवावेत.**
**editorinchief.sambhashit@mu.ac.in** with a cc to
**editor.sambhashit@mu.ac.in**